**MAPOL 2.4M**

# एम. ए. राज्यशास्त्र

## सत्र - II

### राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार सुधारित अभ्यासक्रम

# भारतीय संविधान - II

© UNIVERSITY OF MUMBAI

**प्राध्यापक रविन्द्र कुलकर्णी**
कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राचार्य (डॉ.) अजय भामरे**
प्र-कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक शिवाजी सरगर**
संचालक
दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

| | | |
|---|---|---|
| **कार्यक्रम समन्वयक** | : | **प्रा. अनिल आर बनकर**<br>**सहयोगी प्राध्यापक आणि प्रमुख मानव्यविद्या शाखा**<br>दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र,<br>मुंबई विद्यापीठ, मुंबई. |
| **अभ्यास समन्वयक** | : | **डॉ. दत्तात्रय म. तोंडे**<br>सहायक प्राध्यापक<br>दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र,<br>मुंबई विद्यापीठ, मुंबई. |
| | : | **डॉ. क्षिप्रा वासुदेव**<br>सहायक प्राध्यापक<br>दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र,<br>मुंबई विद्यापीठ, मुंबई. |
| **संपादक** | : | **डॉ. दत्तात्रय म. तोंडे**<br>सहायक प्राध्यापक<br>दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र,<br>मुंबई विद्यापीठ, मुंबई. |
| **लेखक** | : | **प्रा. डॉ. बाबासाहेब त्रिंबक मोताळे**<br>प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग<br>स्व. आण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान<br>महाविद्यालय म्हसदी, ता. साक्री, जि. धुळे |

**फेब्रुवारी २०२५, मुद्रण - १** ISBN 978-93-6728-774-3

**प्रकाशक**
**संचालक,** दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र
मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, मुंबई- ४०० ०९८.

**अक्षर जुळणी आणि मुद्रण**
मुंबई विद्यापीठ मुद्रणालय. विद्यानगरी, मुंबई

# अनुक्रमणिका


| अध्याय क्र. | नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | **संस्थांचे कार्य** | |
| | अ) संसदीय लोकशाही समोरील आव्हाने | १ |
| | ब) कार्यकारी मंडळाचा उदय: पंतप्रधान कार्यालय, मुख्यमंत्री कार्यालय, राज्यपालांची भूमिका | ७ |
| | क) न्यायमंडळ: न्यायालयाचे स्वातंत्र्य, न्यायालयीन पुनर्विलोकन, न्यायालयातील हस्तक्षेप, न्यायालयीन सक्रियता | १७ |
| २ | **स्थानिक स्वराज्य संस्थांचे कार्य** | |
| | अ) ७३ वी आणि ७४ वी घटनादुरुस्ती कायदा | ३६ |
| | ब) नागरी स्थानिक स्वराज्य संस्था- वर्तमान वादविवाद | ४७ |
| | क) ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था- वर्तमान वादविवाद | ५१ |

**एम. ए. राज्यशास्त्र**

**सत्र - II**

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार सुधारित अभ्यासक्रम**

**भारतीय संविधान - II**

## अभ्यासक्रम (मराठी)

**अभ्यासक्रमाची उद्दिष्टे:**

१. विविध संस्थांच्या कामकाजाची विद्यार्थ्यांना ओळख करून देणे

२. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील उत्क्रांती आणि समकालीन गतिशीलतेचा मागोवा घेणे.

**प्रकरण १: संस्थांचे कामकाज**

अ) संसदीय लोकशाहीसमोरील आव्हाने

ब) कार्यकारिणीचा उदय: पंतप्रधान कार्यालय, मुख्यमंत्री कार्यालय, राज्यपालांची भूमिका

क) न्यायपालिका: स्वातंत्र्य, न्यायिक आढावा, हस्तक्षेप, सक्रियता

**प्रकरण २: स्थानिक स्वराज्य संस्थांचे कामकाज**

अ) ७३ वी आणि ७४ वी घटनादुरुस्ती कायदे

ब) शहरी स्थानिक स्वराज्य संस्था: वर्तमानकालीन वादविवाद

क) ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था: वर्तमानकालीन वादविवाद

# SYLLABUS

**Indian Constitution II**
**(2 Credits, 30 Hours)**

**Course objectives**:

1. To acquaint students with the functioning of various institutions
2. To trace the evolution and contemporary dynamics in local self-government bodies.

**Module 1: Working of Institutions**

a) Challenges to Parliamentary Democracy
b) Rise of Executive: Prime Minister's Office, Chief Minister's Office Role of Governor
c) Judiciary: Independence, Judicial Review, Intervention, Activism

**Module 2: Working of Local Self Government**

a) 73rd and 74th Constitutional Amendment Acts
b) Urban Local Self-Government: Current Debates
c) Rural Local Self-Government: Current Debates

**Course Outcomes:**

1. Students will be able to understand the role of various organs of the government
2. By the end of the course, students will be acquainted with the functioning of local self-government bodies.

# SYLLABUS

**Reading List:**


1. Austin, G., & Austin, G. (1999). The Indian Constitution: Cornerstone of a Nation (New Edition). Oxford University Press.
2. Bakshi, P. M. (2018). The Constitution of India. LexisNexis.
3. Basu, D. D. (2015). Introduction to the Constitution of India. LexisNexis.
4. Chakrabarty, B. (2019). Indian Constitution: Text, Context and Interpretation. SAGE Publications.
5. Khatra, J. S. (2021). *Constitutional Amendments in the Indian Constitution: A Horizontal Approach*. KK Publications.
6. Kishore, S., Brij. (2022). *Introduction to the Constitution of India*, Eleventh Edition. PHI Learning Pvt. Ltd.
7. Morris-Jones, W. H. (2015). *Parliament in India*. University of Pennsylvania Press.
8. Naik, M., Khan, S., & Roy, S. N. Bridging the Local–Beyond the 73rd and 74th Amendment.
9. Reddy, M. G. (2003). Status of decentralised local bodies: Post-73rd amendment scenario. *Economic and Political Weekly*, 1284-1292.
10. Sabha, R. (2008). Parliament of India. *Unstarred Question*, (1007).
11. Saumendra, D., & Saibabu, N. (2014). Indian Constitution: An Analysis of the Fundamental rights and the Directive Principles (SSRN Scholarly Paper No. 2592382).
12. Singh, H. (1994). Constitutional base for Panchayati Raj in India: the 73rd amendment act. *Asian Survey*, *34*(9), 818-827.
13. लोखंडे भगवान , 'भारतीय संविधान स्वरूप व तत्वज्ञान ' दुर्वा एजन्सी, पुणे, 2021 .

# १

# संस्थांचे कार्य

**अ) संसदीय लोकशाही समोरील आव्हाने**

**ब) कार्यकारी मंडळाचा उदय: पंतप्रधान कार्यालय, मुख्यमंत्री कार्यालय, राज्यपालांची भूमिका**

**क) न्यायमंडळ: न्यायालयाचे स्वातंत्र्य, न्यायालयीन पुनर्विलोकन, न्यायालयातील हस्तक्षेप, न्यायालयीन सक्रियता**

## अ) संसदीय लोकशाही समोरील आव्हाने (Challenges to The Parliamentary Democracy)

**घटक रचना:**

अ.० उद्दिष्टे/ विषय विवेचन

अ.१ राजकीय अस्थिरता

अ.२ राजकीय पक्षांचे स्वार्थी राजकारण व धोरण

अ.३ भ्रष्टाचार

अ.४ संसदीय कार्यवाहीतील अडथळे

अ.५ नागरिकांची निष्क्रियता

अ.६ संविधानिक मूल्यांचे उल्लंघन

अ.७ सांस्कृतिक, सामाजिक भिन्नता आणि धार्मिक व जातीय ध्रुवीकरण

अ ८ विविध माध्यमे आणि आधुनिक तंत्रज्ञान

अ.९ सामाजिक आणि आर्थिक असमानता

अ.१० मतदान प्रक्रियेतील उणिवा

अ.११ कार्यकारी मंडळाचा न्यायमंडळावरील दबाव

अ.१२ सारांश

### अ.० उद्दिष्टे/ विषय विवेचन

संसदीय लोकशाही ही एक शासनप्रणालीचे रूप किंवा लोकशाही शासनाची एक प्रसिद्ध पद्धत आहे. या शासनप्रणालीमध्ये नागरिकांकडून मतदानाद्वारे प्रतिनिधींची निवड केली जाते आणि या प्रतिनिधी मार्फत कायदे बनवले जातात. कायदे तयार करण्यासाठी केंद्रीय पातळीवर आणि घटकराज्य पातळीवर विधिमंडळे असतात. संसदीय लोकशाहीमध्ये सार्वभौमत्व,

स्वतंत्रता, समानता इ. मूल्यांचा आदर केला जातो. संसदीय लोकशाहीमध्ये नागरिकांच्या सक्रिय सहभागाला अत्यंत महत्त्व आहे. सर्वसामान्य जनतेचे प्रतिनिधी, स्वतंत्र न्यायालय, मुक्त व नि:पक्ष वातावरणात निवडणुकांसाठी असलेली स्वतंत्र व स्वायत्त प्रणाली, शासनाच्या कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ या शाखांची स्वतंत्रता आणि त्यांच्या आचार धर्माची मर्यादा इ. संसदीय लोकशाहीची मूलभूत तत्वे आहेत. संसदीय लोकशाही हा शासन प्रकार जगप्रसिद्ध असला तरी देखील या लोकशाहीला आज अनेक आव्हानांचा सामना करावा लागत आहे. विविध प्रकारच्या सामाजिक राजकीय आणि आर्थिक कारणांमुळे संसदीय लोकशाहीची कार्यप्रणाली आणि तिची मूल्य आज धोक्यात येत आहेत. संसदीय लोकशाही समोर उभी असलेली आव्हाने खालीलप्रमाणे आहेत;

## अ.१ राजकीय अस्थिरता

संसदीय लोकशाहीला राजकीय अस्थिरतेचा सामना अनेक वेळा करावा लागतो. वारंवार सरकारमध्ये होत असलेल्या बदलामुळे त्याचा विपरीत परिणाम संसदीय कामकाजावर होतो. विश्वासदर्शक मत आणि अल्पमत सरकार मुळे संसदीय लोकशाहीच्या कामकाजात अनेक वेळा गोंधळ निर्माण होतो. त्याचप्रमाणे केंद्र किंवा काही घटकराज्यांमध्ये विश्वास दर्शक मत गमावल्यामुळे सरकारमध्ये होणाऱ्या बदलामुळे सरकारची स्थिरता कमी होते. कोणत्याही स्पष्ट बहुमताशिवाय सत्तेवर येणारे सरकार किंवा होत असलेल्या सत्तांतरामुळे संसदीय लोकशाहीमध्ये निर्णय घेणे महाकठीण होते. याशिवाय केंद्र आणि राज्य सरकार यांच्यातील संघर्षामुळे संसदीय लोकशाहीची कार्यक्षमता कमी होते. तसेच संसदीय लोकशाहीतील राजकीय अस्थिरतेमुळे सरकारची विकासात्मक धोरणे प्रभावीपणे अंमलात येऊ शकत नाहीत.

संसदीय लोकशाहीमध्ये जोपर्यंत पंतप्रधान आणि त्यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळावर संसदेचा विश्वास आहे, तोपर्यंतच ते अधिकारपदावर राहू शकतात. विधिमंडळाने पंतप्रधानांसह मंत्रिमंडळावर अविश्वास व्यक्त केल्यास त्याचक्षणी मंत्रिमंडळ पंतप्रधानांसह पायउतार होत असते. प्रत्येकवेळी एकाच राजकीय पक्षाला कायदेमंडळात स्पष्ट बहुमत मिळणे शक्य नसते. अशावेळी दोन किंवा त्यापेक्षा अधिक राजकीय पक्ष एकत्र येऊन त्यांच्या सहकार्याने संयुक्त मंत्रिमंडळ तयार होत असते. परंतु अशा संयुक्त मंत्रिमंडळाचे भवितव्य निश्चित नसते. राजकीय पक्ष परस्परांवर कुरघोडीचे राजकारण करत असल्यामुळे व्यवहाराहात अशा संयुक्त मंत्रिमंडळाला स्थैर्य लाभणे शक्य नसते. त्यामुळे संसदीय लोकशाहीत असे संयुक्त मंत्रिमंडळ बनल्यास त्या मंत्रिमंडळाचा बराचसा कालावधी परस्परांची मनधरणी करण्यामध्ये खर्च होतो. परिणामी असे मंत्रिमंडळ जनहित व देशहित साध्य करण्यासाठी कोणताही दीर्घकालीन निश्चित कार्यक्रम वा धोरण ठरवू शकत नाही. थोडक्यात संसदीय लोकशाहीमध्ये मंत्रिमंडळापुढे अस्थिरतेची टांगती तलवार सदैव असते. त्यामुळे असे अस्थिर शासन कोणतेही चांगले कार्य करू शकत नाही.

## अ.२ राजकीय पक्षांचे स्वार्थी राजकारण व धोरण

राजकीय पक्षांचे पक्षीय राजकारण, त्यांचे धोरण आणि पक्षीय भेदभाव हे देखील संसदीय लोकशाही समोरील एक महत्त्वाचे आव्हान ठरत आहे. विशेषतः मोठ्या राजकीय पक्षांच्या

स्वार्थी राजकारणामुळे संसदीय लोकशाहीमध्ये अनेक अडचणी निर्माण झालेले आहेत. राजकीय पक्षांच्या स्वहितासाठी काही वेळा लोकशाही मूल्यांचे उल्लंघन झालेले दिसून येते. याशिवाय राजकीय पक्षांमध्ये असणारा अंतर्गतपक्षीय स्वार्थ यामुळे सरकारचे होणारे निर्णय जनहितासाठी न होता ती पक्ष हितासाठी होताना दिसतात. राजकीय पक्षांवर असणारा बाह्य दबाव आणि पक्षीय स्वार्थ यामुळे लोकशाहीतील न्याय आणि स्वच्छता धोक्यात आलेली आहे. याशिवाय सत्ता प्राप्तीसाठी एक राजकीय पक्ष दुसऱ्या पक्षात विलीन होत असल्यामुळे राजकीय पक्षावरील मतदारांचा विश्वास दळमळीत झालेला आहे. याशिवाय राजकीय पक्षांच्या स्वार्थी धोरणामुळे मतदारांमध्ये असंतोष निर्माण होउन त्यांच्यातील पक्षनिष्ठा कमी होत आहे. मोठ्या राजकीय पक्षांच्या स्वार्थी राजकारणामुळे छोट्या राजकीय पक्षांमध्ये घालमेल सुरू होऊन संसदीय लोकशाहीतील लहान राजकीय पक्षांचे अस्तित्व धोक्यात येत आहे.

## अ.३ भ्रष्टाचार

भ्रष्टाचार हे संसदीय लोकशाही समोरील एक मोठे आव्हान ठरलेले आहे. विविध स्तरावर होणाऱ्या निवडणुकीमध्ये पैसे व प्रभावाचा वापर करणे, सरकारी निधीचा गैरवापर करणे आणि इतर प्रकारच्या भ्रष्टाचारी कृत्यांमुळे संसदीय लोकशाही धोक्यात येत आहे.

संसदीय लोकशाहीमध्ये ज्या पक्षाला कायदेमंडळात स्पष्ट बहुमत असते, त्यापक्षाचे सरकार स्थापन होते. म्हणून प्रत्येक राजकीय पक्ष कायदेमंडळात स्पष्ट बहुमत प्राप्त करण्यासाठी धडपडत असतो. परंतु एखाद्या वेळी कायदेमंडळात कोणत्याही एका राजकीय पक्षाला स्पष्ट बहुमत प्राप्त नसल्यास अशावेळी अनेक पक्ष एकत्र येऊन संयुक्त मंत्रीमंडळ स्थापन करतात. अनेक पक्ष एकत्र येऊन स्थापन झालेले मंत्रिमंडळ अस्थिरतेचे झोके घेत असते. म्हणून अशा अस्थिर मंत्रिमंडळाला सहभागी सर्व राजकीय पक्षांचा कायम पाठिंबा राहावा यासाठी राजकीय पक्षांच्या लोकप्रतिनिधींना विविध आमिषं दाखवली जातात. परिणामी अशा मंत्रिमंडळात अकार्यक्षमता आणि भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात वाढण्याचा धोका उत्पन्न होतो.

## अ.४ संसदीय कार्यवाहीतील अडथळे

संसदीय लोकशाहीमध्ये संसदीय कार्यवाहीला महत्त्वाचे स्थान असते. परंतु संसदीय कार्यवाहीमध्ये अनेक वेळा गोंधळ आणि विरोधी पक्षांच्या आंदोलनाच्या अडथळ्यामुळे महत्त्वाच्या मुद्द्यावर संसदेत चर्चा होऊ शकत नाही. यामुळे संसदेची कार्यक्षमता प्रभावित होऊन जनहितासाठी महत्त्वाचे असणारे कायदे वेळेवर मंजूर होऊ शकत नाहीत. संसदीय लोकशाहीमध्ये अनेक वेळा विरोधी पक्षांकडून करण्यात येणारा गोंधळ, वादग्रस्त उपक्रम, संसदीय कारवाई थांबवणे यामुळे संसदीय लोकशाही समोर गंभीर आव्हाने उभे राहून शासनाच्या विविध धोरणांची अंमलबजावणी होण्यास धोका निर्माण होतो. संसदीय लोकशाहीमध्ये काही वेळा वादविवाद होऊन संसद संस्थगित केली जाते. त्यामुळे पर्यायाने महत्त्वाच्या विधेयकावर चर्चा किंवा निर्णय होत नाही.

## अ.५ नागरिकांची निष्क्रियता

संसदीय लोकशाहीमध्ये नागरिकांच्या सक्रिय सहभागाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. कारण नागरिकांच्या सक्रिय सहभागाशिवाय संसदीय लोकशाही यशस्वी होऊ शकत नाही. परंतु नागरिकांमध्ये राजकीय सहभागाविषयी असणाऱ्या जागरूकतेचा अभाव, शिक्षणाच्या अल्प सुविधा, राजकारणातील गोडी कमी असणे, राजकारणापासून नागरिकांचा असलेला दुरावा, मतदान प्रक्रियेत किंवा निवडणूक प्रक्रियेत सहभाग न घेणे, राजकारणातील निर्णय प्रक्रियेत सहभागी न होणे इ. बाबी संसदीय लोकशाहीसाठी निश्चितच चिंतेचा विषय बनलेल्या आहेत. यामुळे संसदीय लोकशाही समोर नागरिकांच्या सक्रिय सहभाग वाढवण्याचे मोठे आव्हान निर्माण झालेले आहे.

## अ.६ संविधानिक मूल्यांचे उल्लंघन

न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता हे संसदीय लोकशाहीचे मूलभूत संविधानिक मूल्य आहेत. संसदीय लोकशाहीमध्ये या मूल्यांचे पालन करणे अत्यंत महत्त्वपूर्ण असते परंतु अनेक वेळा या तत्त्वांना हानी पोहोचवली जाते किंवा संविधानिक संरचनामध्ये या मूल्यांमध्ये फेरफार करण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे लोकशाहीच्या मुळावरच घाव घातला जातो. थोडक्यात संसदीय लोकशाहीच्या आधारभूत मूल्यांचे उल्लंघन होत असल्यामुळे संसदीय लोकशाही कमजोर होते. सरकारच्या आदेशामुळे संविधानातील संसदीय मूल्यांचे उल्लंघन करणे, न्यायालयीन आदेशाचे पालन न करणे, नागरिकांच्या मूलभूत हक्कांवर आक्रमण करणे, संविधानिक मूल्य आणि अधिकारांचे उल्लंघन करणे, कायद्याची चुकीची अंमलबजावणी करून नागरिकांच्या हक्कांचे उल्लंघन करणे इ. प्रकारांमुळे संसदीय लोकशाही समोर आव्हाने निर्माण झालेली आहेत.

## अ.७ सांस्कृतिक, सामाजिक भिन्नता आणि धार्मिक व जातीय ध्रुवीकरण

संसदीय लोकशाही शासनपद्धती असणाऱ्या देशात असे विभिन्न सांस्कृतिक, धार्मिक, भाषिक आणि जातीय गट असतात की, जे संसदीय लोकशाही व्यवस्थेसमोर आव्हाने निर्माण करतात. अशा विविध प्रकारच्या गटांचे प्रतिनिधित्व, त्यांच्या गरजा आणि त्यांच्या हक्कांचा आदर करत असताना या सर्व गटात एकजूट राखणे कठीण होत असल्यामुळे संसदीय लोकशाहीत विविधतेत एकता स्विकारण्यात अडचणी निर्माण होतात. पर्यायाने बहुसंख्यांक आणि अल्पसंख्यांक गटांमध्ये तणाव निर्माण होऊन जातीय, धार्मिक, भाषिक इ. विविध आधारावर विविध प्रकारचे वाद निर्माण होऊन गोंधळाची परिस्थिती निर्माण होते. विविध जाती, धर्म, समुदायांमध्ये असलेला भेदभाव आणि त्यांच्या संदर्भातील पक्षीय मतभेद यामुळे गोंधळाची स्थिती निर्माण होते. थोडक्यात समाजातील विविध गटांच्या अस्तित्वामुळे लोकशाही प्रक्रिया विकृत होऊन निर्णय प्रक्रियेत अडथळे निर्माण होतात. धर्म व जातीच्या आधारावर विविध गटांचे ध्रुवीकरण करून राजकीय पक्ष आणि नेते मतदारांची वोट बँक तयार करतात. यामधून मतदारांचे होणारे विभाजन संसदीय लोकशाहीला असुरक्षित करीत असते. यामुळे जातीय व धार्मिक आधारावर दंगली निर्माण करण्याचे साधन राजकीय पक्ष आणि नेत्यांच्या हातात मिळते, ही बाब संसदीय लोकशाहीला अत्यंत अपायकारक आणि आव्हानात्मक ठरते.

## अ.८ विविध माध्यमे आणि आधुनिक तंत्रज्ञान

विविध प्रकारची माध्यमे ही लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून ओळखले जातात. ही सर्व माध्यमे शासनावर नियंत्रण ठेवण्याचे महत्त्वाचे कार्य करीत असतात. परंतु अनेक वेळा विविध प्रकारच्या माध्यमांवर सरकारकडून किंवा राजकीय पक्षाकडून दबाव आणला जातो पर्यायाने संसदीय लोकशाहीतील जनतेला योग्य ती माहिती योग्य वेळेत मिळत नाही. विविध प्रकारची समाज माध्यमे आणि आधुनिक तंत्रज्ञानामध्ये अत्यंत वेगाने होणारा बदल यामुळे माहितीचा प्रसार अत्यंत जलद गतीने होतो. अनेक वेळा समाज माध्यमे आणि तंत्रज्ञानाचा गैरवापर करून फेक न्यूज, प्रचार किंवा अफवा जनतेमध्ये पसरवल्या जातात, ज्यामुळे जनतेच्या विचारसरणीवर नकारात्मक परिणाम होऊन लोकशाहीच्या निर्णय प्रक्रियेमध्ये अडथळे निर्माण केले जातात. थोडक्यात विविध प्रकारच्या माध्यमांचा चुकीच्या पद्धतीने होणारा वापर संसदीय लोकशाहीला धोका पोहोचवत असतो. पर्यायाने आधुनिक तंत्रज्ञानात होणाऱ्या प्रचंड बदलामुळे आणि समाज माध्यमांमुळे संसदीय लोकशाही समोर मोठे आव्हान उभे राहिलेले आहे.

## अ.९ सामाजिक आणि आर्थिक असमानता

संसदीय लोकशाहीमध्ये सर्व नागरिकांना समान संधी मिळणे अपेक्षित असते, परंतु समाजामध्ये असणारी सामाजिक असमानता आणि आर्थिक विषमता यामुळे काही घटकांना संसदीय लोकशाही प्रक्रियेत सक्रियपणे सहभाग घेण्याची समान संधी मिळणे कठीण होते. जात, धर्म आणि लिंग इत्यादीच्या आधारावर संसदीय लोकशाहीत होणाऱ्या भेदभावामुळे जनतेचे योग्य प्रतिनिधित्व आणि समानतेच्या तत्वाला धोका पोहोचतो. महिला, दलित, आदिवासी, अल्पसंख्यांक आणि गरीब समुदायाचे राजकारणातील प्रतिनिधित्व कमी झाल्यामुळे समानतेच्या तत्वाला धोका पोहोचून संसदीय लोकशाही समोर आव्हाने उभे राहतात.

## अ.१० मतदान प्रक्रियेतील उणिवा

पण कधी ये लोकशाहीमध्ये निवडणूक प्रक्रियेला अत्यंत महत्त्वाचे स्थान असते, परंतु अनेक वेळा निवडणुकीची प्रक्रिया विवादास्पद असतात त्यांना दिसते. इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशीन बद्दल घेण्यात येणारी शंका, मतदान केंद्र ताब्यात घेणे किंवा मतदान केंद्रात होणाऱ्या गोंधळामुळे निवडणुकीच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होते. थोडक्यात निवडणूक प्रक्रियेत होणारे गैरप्रकार संसदीय लोकशाही प्रक्रियेला धोका पोहोचवत असून संसदीय लोकशाही समोर आव्हान ठरलेली आहेत.

## अ.११ कार्यकारी मंडळाचा न्यायमंडळावरील दबाव

संसदीय लोकशाहीमध्ये कार्यकारी मंडळ, कायदे मंडळ, आणि न्यायमंडळ अशी विभागणी करण्यात आलेली असली तरीदेखील कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ यांच्यामध्ये असलेला संघर्ष संसदीय लोकशाहीला आव्हानात्मक ठरलेला आहे. कार्यकारी मंडळ न्यायमंडळावर दबाव आणण्याचा प्रयत्न करीत असते. तसेच अनेक वेळा कार्यकारी मंडळ

न्यायमंडळांने दिलेल्या आदेशांचा आदर न करता कायद्यांचे उल्लंघन करताना दिसते. अशाप्रकारे कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ यांच्यातील मतभेद आणि संघर्षामुळे लोकशाहीतील स्वतंत्रतेच्या तत्वाला धक्का पोहोचून संसदीय लोकशाही प्रणालीमध्ये प्रभावी कार्यवाही खंडित होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## अ.१२ सारांश

संसदीय लोकशाही ही एक सशक्त आणि अत्यंत प्रभावी शासन प्रणाली आहे. परंतु असे असले तरी देखील संसदीय लोकशाही समोर आज अनेक आव्हाने उभी राहिलेली आहेत. त्यामुळे संसदीय लोकशाहीचे अस्तित्व धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही. संसदीय लोकशाही समोरील आव्हाने पेलण्यासाठी संसदीय लोकशाही मूल्यांचे संरक्षण करणे आवश्यक आहे. यासाठी जनतेमध्ये जागरूकता वाढवणे, संसदीय प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि प्रभावी बनवणे, संसद आणि न्यायालय पूर्णतः स्वायत्त करणे, प्रशासनातील पारदर्शकता वाढवणे, संविधान आणि कायद्याचा आदर राखणे आवश्यक आहे. संसदीय लोकशाहीला अधिक कार्यक्षम आणि सशक्त करण्यासाठी सरकार, विरोधी पक्ष, विविध राजकीय संस्था आणि नागरिक यांनी एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे.

❄❄❄❄❄❄❄

# ब) कार्यकारी मंडळाचा उदय

**घटक रचना:**

ब.० उद्दिष्टे

ब.१ पंतप्रधान कार्यालयाची कार्य

ब.२ पंतप्रधान कार्यालयाचे प्रधान सचिव

ब.३ मुख्यमंत्री कार्यालय

ब.४ मुख्यमंत्री कार्यालयाचे कार्य

ब.५ मुख्यमंत्री कार्यालयाचे कार्य मुख्यमंत्री कार्यालयाचे मुख्य सचिव

ब.६ राज्यपालांची भूमिका

## ब.० उद्दिष्टे

### पंतप्रधान कार्यालय (PMO- Prime Minister's Office)

पंतप्रधान कार्यालय हा एक भारत सरकारच्या प्रशासकीय यंत्रणेचा प्रमुख आणि महत्त्वाचा भाग आहे. हे कार्यालय पंतप्रधानांना त्यांच्या रोजच्या कार्यात सहाय्य करण्यासाठी कार्यरत असते. त्याचप्रमाणे पंतप्रधान कार्यालय हे देशाच्या धोरणात्मक, प्रशासकीय आणि सुरक्षाविषयक विषयांवर तसेच निर्णय प्रक्रियेत सहाय्य करून पंतप्रधानांना सल्ला देते आणि त्याची अंमलबजावणी देखील सुनिश्चित करीत असते. भारताचे पंतप्रधान कार्यालय हे नवी दिल्ली येथील 'साऊथ ब्लॉक' मध्ये स्थित आहे. पंतप्रधान कार्यालयाचे पूर्वीचे नाव 'पंतप्रधानांचे सचिवालय' असे होते. पंतप्रधान कार्यालयामध्ये प्रधान सचिव, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार, विशेष सचिव, संयुक्त सचिव विविध वरिष्ठ अधिकारी, सल्लागार, सहाय्यक, तंत्रज्ञ आणि इतर कर्मचारी असतात. पंतप्रधान कार्यालयाचे प्रधान सचिव हे प्रमुख अधिकारी असतात जे पंतप्रधान कार्यालयाच्या सर्व कामकाजावर देखरेख ठेवत असतात. पंतप्रधान कार्यालयातील राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार हे देशाच्या सुरक्षाविषयक विषयांवर पंतप्रधानांना सल्ला देणारे प्रमुख अधिकारी असतात. त्याचप्रमाणे धोरणात्मक आणि प्रशासकीय कामकाजासाठी सहाय्यक अधिकारी म्हणून विशेष सचिव पंतप्रधान कार्यालयामध्ये कार्यरत असतात.

## ब.१ पंतप्रधान कार्यालयाची कार्य (Functions of the PMO)

पंतप्रधान कार्यालय हे भारताच्या राजकीय आणि प्रशासकीय व्यवस्थेचे केंद्रबिंदू असते. या कार्यालयामार्फत देशाच्या प्रगतीसाठी धोरण निर्मिती आणि त्या धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी खालील प्रकारची कार्य केली जातात;

१) **प्रशासकीय व धोरणात्मक निर्णय सहाय्य:** देशातील विविध प्रशासकीय व धोरणात्मक विषयावर पंतप्रधानांना सल्ला देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पंतप्रधान कार्यालय करीत असते. देशाची अर्थव्यवस्था, परराष्ट्र धोरण, सुरक्षा तसेच सामाजिक कल्याण

इ. संबंधीच्या निर्णय प्रक्रियेमध्ये पंतप्रधानांना सल्ला देण्याचे कार्य हे कार्यालय करते. थोडक्यात देशाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून महत्वपूर्ण असलेल्या प्रशासकीय व धोरणात्मक बाबींमध्ये पंतप्रधान कार्यालयाची भूमिका महत्त्वपूर्ण असते.

२) **समन्वय साधने:** केंद्र सरकारची विविध मंत्रालये, देशातील राज्य सरकार आणि सरकारच्या वेगवेगळ्या विभागांमध्ये समन्वय साधण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पंतप्रधान कार्यालय करीत असते. त्याचप्रमाणे राष्ट्रीय पातळीवर राबविल्यास जाणाऱ्या महत्त्वाच्या प्रकल्पावर एकत्रित कामकाज करण्याची जबाबदारी देखील हे कार्यालय घेत असते.

३) **प्रशासकीय धोरणांची अंमलबजावणी आणि देखरेख:** देशाच्या पंतप्रधानांनी वेळोवेळी दिलेल्या सूचनांची सुनिश्चितपणे अंमलबजावणी करण्याचे कार्य पंतप्रधान कार्यालय करते. राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय धोरणांचा अभ्यास करून हे कार्यालय वेगवेगळ्या धोरणांची अंमलबजावणी कशी करायची यासंदर्भात निर्णय घेत असते. त्याचप्रमाणे केंद्र सरकार मार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना व धोरणांची अंमलबजावणी कशी होते यावर नियंत्रण व देखरेख ठेवण्याचे कार्य देखील हे कार्यालय करते. केंद्र सरकार मार्फत देशभर राबविल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या योजना आणि प्रकल्प यांची वेळोवेळी प्रगती तपासण्याचे कार्य हे कार्यालय करते.

४) **सुरक्षा व्यवस्था व गुप्तचर माहिती:** राष्ट्रीय सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून पंतप्रधान कार्यालयाचे सुरक्षा विषयक कार्य महत्त्वपूर्ण असते. गुप्तचर यंत्रणांकडून मिळालेल्या माहितीचा वेळोवेळी आढावा घेणे आणि त्या संदर्भात योग्य निर्णय घेण्याचे कार्य हे कार्यालय करीत असते. देशाच्या सुरक्षिततेच्या संदर्भातील माहितीची जबाबदारी प्रामुख्याने पंतप्रधान कार्यालयावर असते. राष्ट्रीय सुरक्षा विषयक विषयांवर त्वरित उपाययोजना करण्याचे कार्य देखील हे कार्यालय पंतप्रधानांच्या मार्गदर्शनाखाली करीत असते.

५) **जनसंपर्क:** पंतप्रधान कार्यालय पंतप्रधानांच्या देशात होणाऱ्या सार्वजनिक सभा, परदेश दौरे तसेच इतर कार्यक्रमांचे नियोजन करीत असते. त्याचप्रमाणे पंतप्रधानांमार्फत देशातील जनतेच्या हितासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती प्रसारित करण्याची मुख्य जबाबदारी पंतप्रधान कार्यालयाचे असते. त्याचप्रमाणे पंतप्रधान कार्यालयामध्ये जनतेकडून वेळोवेळी आलेल्या तक्रारी सूचना आणि अर्ज यांचे निराकरण करण्याची देखील जबाबदारी असते. जनतेकडून आलेले अर्ज किंवा समस्ये संदर्भातील तक्रारींचा स्विकार करून त्यावर वेळेत योग्य ती कार्यवाही पंतप्रधान कार्यालयाकडून केली जाते.

६) **आंतरराष्ट्रीय संबंध आणि परराष्ट्र दौरे:** पंतप्रधान कार्यालयामार्फत पंतप्रधानांच्या परराष्ट्र दौऱ्याचे संपूर्ण नियोजन करण्यात येते. त्याचप्रमाणे हे कार्यालय पंतप्रधानांना परराष्ट्र धोरणासंदर्भात सल्ला देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करीत असते. दुसऱ्या देशाचे आपल्या देशात असणारे परदेशी प्रतिनिधी आणि आंतरराष्ट्रीय संस्था यांच्या समन्वय साधण्याची जबाबदारी पंतप्रधान कार्यालयाचे असते.

७) **माहिती आणि प्रसार:** पंतप्रधान कार्यालयामार्फत जनता आणि देश हितासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या उपक्रमांची आणि धोरणांच्या माहितीचा प्रसार विविध प्रसार माध्यमांद्वारे जनतेपर्यंत पोहोचविण्याचे कार्य पंतप्रधान कार्यालय करीत असते. पंतप्रधानांनी जनहितासाठी राबविल्या उपक्रम व धोरणांची माहिती जनतेला अधिकृतपणे व्हावी यासाठी अधिकृतपणे प्रेस नोट जारी करण्याचे कार्य हे कार्यालय करीत असते.

## ब.२ पंतप्रधान कार्यालयाचे प्रधान सचिव (Chief Secretary of the PMO)

पंतप्रधान कार्यालय हे भारत सरकारच्या प्रशासनाचा केंद्रबिंदू आहे. पंतप्रधानांच्या कार्यक्षमतेत आणि भूमिकेमध्ये भर घालण्यासाठी हे कार्यालय विविध अंगानी सहकार्य करीत असते. पंतप्रधान कार्यालयामध्ये प्रधान सचिव, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार, विशेष सचिव, वरिष्ठ अधिकारी, सल्लागार, तंत्रज्ञ तसेच इतर कर्मचारी असतात. पंतप्रधान कार्यालयाचे प्रमुख प्रशासकीय अधिकारी म्हणून प्रधान सचिव कार्य करीत असतात. पंतप्रधान कार्यालयातील एक महत्त्वाचा अधिकारी म्हणून प्रधान सचिवांकडे पाहिले जाते. प्रधान सचिव हे पंतप्रधानांचे सर्वात महत्त्वाचे सल्लागार असतात. प्रधान सचिव पंतप्रधानांच्या सर्व निर्णय प्रक्रियेमध्ये आणि कामकाजामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असतात. पंतप्रधान कार्यालयाच्या प्रधान सचिवांना खालील कार्यामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडावी लागते;

१) पंतप्रधानांना विविध प्रशासकीय आणि धोरणात्मक विषयावर सल्ला देणे.

२) पंतप्रधान कार्यालयाने ठरवलेल्या धोरणाची प्रत्यक्ष अमलबजावणी करणे.

३) पंतप्रधान कार्यालय, केंद्र सरकारची विविध मंत्रालये आणि विभाग-उपविभाग यांच्यात समन्वय साधने.

४) देशातील राज्य सरकारे आणि देशाचे परदेशातील असणारे प्रतिनिधी यांच्याशी वेळोवेळी संवाद साधने.

५) पंतप्रधानांपर्यंत पोहोचणाऱ्या सर्व फाइल्स आणि महत्त्वाचे दस्तऐवज यांचे परीक्षण करणे.

६) पंतप्रधानांच्या सभा, बैठका, परदेश दौरे आणि इतर सर्व कार्यक्रमांचे व्यवस्थापन करणे.

७) गुप्तचर आणि सुरक्षा यंत्रणेकडून आलेल्या माहितीचा आढावा घेऊन ती वेळोवेळी पंतप्रधानांना देणे.

८) पंतप्रधान कार्यालयाच्या कामकाजावर देखरेख व नियंत्रण ठेवणे.

९) पंतप्रधान कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रम व कार्यक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याची जबाबदारी पार पाडणे.

अशाप्रकारे प्रधान सचिव हे पंतप्रधान कार्यालयातील एक अत्यंत महत्त्वाचे पद असून पंतप्रधानांचे मुख्य विश्वासू अधिकारी म्हणून या पदाकडे पाहिले जाते. पंतप्रधानांच्या सर्व धोरणात्मक निर्णयामध्ये प्रधान सचिवांची भूमिका महत्त्वाची असते. प्रधान सचिवांच्या कार्यक्षमतेवर पंतप्रधान कार्यालयाचे यशापयश अनेक वेळा अवलंबून असते.

---

**सारांश**

भारतीय संसदीय लोकशाहीमध्ये पंतप्रधान कार्यालय हे भारताच्या राजकीय आणि प्रशासकीय व्यवस्थेचा केंद्रबिंदू ठरलेले आहे. देशाची प्रगती आणिविकासासाठी हे कार्यालय प्रभावीपणे धोरणांची अंमलबजावणी करीत असते. त्याचप्रमाणे पंतप्रधानांच्या कार्यक्षमतेत अधिक भर घालण्यासाठी पंतप्रधान कार्यालय विविध अंगाने सहाय्य करण्याचा प्रयत्न करीत असते.

## ब.३ मुख्यमंत्री कार्यालय (Chief Minister's Office)

राज्य सरकारच्या प्रशासकीय व्यवस्थेतील एक अत्यंत महत्त्वाचा घटक म्हणून मुख्यमंत्री कार्यालयाकडे पाहिले जाते. मुख्यमंत्री कार्यालय हे राज्य शासनाचे प्रशासकीय केंद्र असून मुख्यमंत्र्यांच्या कारभाराचे व्यवस्थापन, निर्णय प्रक्रियेत सल्ला देणे आणि धोरणाची प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्यासाठी सहाय्य करणारे एक महत्त्वाचे कार्यालय आहे. थोडक्यात मुख्यमंत्री कार्यालय हे मुख्यमंत्र्यांना त्यांच्या प्रशासकीय, धोरणात्मक आणि सामाजिक जबाबदाऱ्यांमध्ये सहाय्य करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असते. राज्य सरकारच्या स्थापनेपासूनच मुख्यमंत्री कार्यालय कार्यरत आहे. मुख्यमंत्री कार्यालय हे प्रत्येक घटकराज्याच्या राजधानीमधील सचिवालय किंवा मुख्यमंत्री यांच्या निवासस्थानी असते. मुख्यमंत्री कार्यालयाचा प्रमुख प्रशासकीय अधिकारी म्हणून एक मुख्य सचिव असतात. मुख्य सचिव हे मुख्यमंत्री कार्यालयाच्या कामकाजावर देखरेख व नियंत्रण ठेवतात. याशिवाय मुख्यमंत्री कार्यालयामध्ये विशेष सचिव, सहाय्यक सचिव हे मुख्यमंत्र्यांना धोरणात्मक व प्रशासकीय कार्यासाठी सहाय्यक अधिकारी म्हणून कार्यरत असतात. राजकीय सल्लागार हे मुख्यमंत्र्यांना राजकीय व सामाजिक विषयावर सल्ला देण्याचे कार्य करतात. याशिवाय मुख्यमंत्री कार्यालयामध्ये इतर अधिकारी आणि कर्मचारी वर्ग कार्यरत असतो.

## ब.४ मुख्यमंत्री कार्यालयाचे कार्य (Functions of Chief Ministers Office)

मुख्यमंत्री कार्यालय हे प्रत्येक घटकराज्याच्या प्रशासनाचे केंद्रबिंदू किंवा हृदय असते. राज्याची प्रगती आणि विकासामध्ये मुख्यमंत्री कार्यालय महत्त्वाची भूमिका बजावताना खालील वेगवेगळ्या प्रकारची कार्य करीत असते;

१) **प्रशासकीय सहाय्य आणि सल्ला:** संबंधित घटकराज्यातील प्रशासकीय कामकाजा संदर्भात मुख्यमंत्र्यांना प्रशासकीय सल्ला देण्याचे कार्य मुख्यमंत्री कार्यालय करीत

असते. प्रशासकीय धोरण ठरवत असताना आवश्यक ती माहिती संकलित करून मुख्यमंत्र्यांना त्या संदर्भात योग्य सल्ला देण्यामध्ये मुख्यमंत्री कार्यालयाची भूमिका महत्त्वाची असते.

२) **समन्वय:** राज्य सरकारच्या विविध मंत्रालये आणि विभाग-उपविभागांमध्ये समन्वय साधण्यामध्ये मुख्यमंत्री कार्यालयाची भूमिका महत्त्वाची असते. घटक राज्यातील सर्व राजकीय पक्षांशी संवाद साधून त्यांच्याशी सहकार्य वाढवण्याचे कार्य समन्वयाच्या माध्यमातून हे कार्यालय करते. समन्वय साधला गेल्यामुळे विविध मंत्रालये आणि विभाग-उपविभागामधील कामकाज सुरळीतपणे चालण्यास मदत होते.

३) **धोरणात्मक निर्णयात सहाय्य:** घटकराज्याच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि इतर क्षेत्रातील विकासासाठी धोरण तयार करताना या कार्यालयाची भूमिका महत्त्वाचे असते. म्हणूनच राज्याच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व इतर बाबतीतील विकासासाठी महत्त्वपूर्ण धोरणांचा मसुदा तयार करण्याचे काम मुख्यमंत्री कार्यालय करीत असते.

४) **विकास प्रकल्पांचे नियोजन आणि अंमलबजावणी:** घटक राज्यातील विविध विकास प्रकल्पांचे नियोजन करण्यामध्ये आणि त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यामध्ये मुख्यमंत्री कार्यालयाची भूमिका महत्त्वाची असते. त्याचप्रमाणे संबंधित विकास प्रकल्पासाठी आवश्यक असणाऱ्या निधीची तरतूद सुनिश्चित करण्यामध्ये देखील मुख्यमंत्री कार्यालय महत्त्वाचे कार्य करते. थोडक्यात मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली राज्याच्या प्रगती आणि विकासासाठी आवश्यक पावले उचलण्याचे कार्य मुख्यमंत्री कार्यालय करते.

५) **जनसंपर्क आणि संवाद:** राज्यातील जनतेच्या तक्रारी, अर्ज किंवा समस्यांचे निवारण करण्यामध्ये मुख्यमंत्री कार्यालय अग्रेसर असते. जनतेकडून आलेल्या तक्रारी किंवा अर्जांचा स्विकार करून त्यावर त्वरित कार्यवाही करण्यासाठी हे कार्यालय वेळीच पावले उचलत असते. याशिवाय मुख्यमंत्र्यांच्या सार्वजनिक सभा, दौरे आणि बैठका यांचे नियोजन आणि व्यवस्थापन मुख्यमंत्री कार्यालयाकडून केले जाते.

६) **कायदा आणि सुव्यवस्था:** राज्यामध्ये कायदा आणि सुव्यवस्था सांभाळण्याची जबाबदारी मुख्यमंत्री कार्यालयाची असते. कायदा आणि सुव्यवस्थेच्या संदर्भात पोलीस प्रशासन आणि न्यायिक यंत्रनेशी समन्वय साधण्याचे कार्य मुख्यमंत्री कार्यालय करते. थोडक्यात राज्यातील कायदा व सुव्यवस्थेवर बारीक लक्ष ठेवण्याची जबाबदारी मुख्यमंत्री कार्यालयाची असते.

७) **आंतरराज्य संबंध आणि समन्वय:** केंद्र सरकार आणि देशातील इतर घटकराज्य यांच्याशी समन्वय साधण्याची जबाबदारी मुख्यमंत्री कार्यालयाचे असते. केंद्र सरकार आणि घटक राज्याशी संवाद साधून परस्पर सामंजस्याचे धोरण निर्माण करण्यामध्ये मुख्यमंत्री कार्यालयाची भूमिका महत्त्वाची असते. अशाप्रकारचा समन्वय साधून घटकराज्यांशी परस्पर सहकार्या निर्माण करण्यास चालना देण्याचे कार्य हे कार्यालय करीत असते.

८) **सुरक्षा व्यवस्थापन:** मुख्यमंत्री कार्यालयावर मुख्यमंत्र्यांच्या सुरक्षा व्यवस्थेची प्रमुख जबाबदारी असते. ही जबाबदारी पार पाडत असताना राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेच्या संदर्भात उपाययोजना करण्यामध्ये मुख्यमंत्री कार्यालय महत्त्वाची भूमिका बजावत असते.

९) **नागरी सेवा व्यवस्थापन:** घटकराज्य सरकार राबवित असलेल्या विविध योजनांची अंमलबजावणी योग्य पद्धतीने होण्यासाठी नागरी सेवांचे व्यवस्थापन करण्यामध्ये मुख्यमंत्री कार्यालय महत्त्वाची भूमिका पार पाडते.

१०) **संसदीय कार्य:** मुख्यमंत्र्यांना विधानसभेत झालेली चर्चेसंदर्भात, विधेयकांचा अभ्यास करून तसेच इतर संसदीय कार्यामध्ये सल्ला देण्याचे कार्य मुख्यमंत्री कार्यालय करीत असते. याशिवाय घटकराज्य विधिमंडळाच्या कामकाजावर देखरेख ठेवण्यामध्ये देखील या कार्यालयाची भूमिका महत्त्वाची असते.

## ब.५ मुख्यमंत्री कार्यालयाचे कार्य मुख्यमंत्री कार्यालयाचे मुख्य सचिव (Chief Secretary of the CMO)

राज्य सरकारच्या प्रशासनातील तसेच मुख्यमंत्री कार्यालयातील एक अत्यंत महत्त्वाचे पद म्हणून मुख्यमंत्री कार्यालयाच्या मुख्य सचिवांच्या पदाकडे बघितले जाते. मुख्यमंत्री कार्यालयातील मुख्य सचिव हे मुख्यमंत्री कार्यालयाची कार्य आणि प्रशासन यावर देखरेख व नियंत्रण ठेवतात. त्याचप्रमाणे मुख्यमंत्र्यांना धोरणात्मक कार्य सहाय्य करतात. मुख्यमंत्री कार्यालयाचे मुख्य सचिव प्रामुख्याने खालील महत्त्वाची कार्य करतात;

१) राज्याच्या मुख्यमंत्र्यांना प्रशासकीय, धोरणात्मक आणि सामाजिक बाबतीमध्ये सल्ला देणे.

२) राज्य सरकारची सर्व प्रशासकीय कार्य आणि धोरणे यासंदर्भात मुख्यमंत्र्यांशी सल्लामसलत करणे.

३) राज्य सरकारची सर्व मंत्रालये आणि विभाग-उपविभाग यामध्ये समन्वय साधने.

४) मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार प्रशासकीय योजनांची अंमलबजावणी सुनिश्चित करणे.

५) मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासकीय प्रक्रिया पार पाडणे.

६) राज्य सरकारच्या अंतर्गत असणाऱ्या विविध प्रकल्पांच्या प्रगती कार्यावर लक्ष ठेवणे.

७) मुख्यमंत्र्यांच्या कार्यक्रमाचे व्यवस्थापन करणे. यामध्ये मुख्यमंत्र्यांच्या बैठका, सभांचे आयोजन आणि सार्वजनिक कार्यक्रमांचे व्यवस्थापन केले जाते.

८) केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्यात समन्वय साधने.

९) आंतरराज्यीय धोरणासंदर्भात मुख्यमंत्र्यांना सल्ला देणे.

१०) राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाने निर्णय घेणे आणि सुरक्षा व्यवस्थेवर देखरेख ठेवणे.

अशाप्रकारे मुख्यमंत्री कार्यालयातील मुख्य सचिव हे आपल्या कार्याच्या माध्यमातून राज्याच्या प्रशासकीय व धोरणात्मक बाबतीत महत्त्वाची भूमिका बजावत असतात. मुख्य सचिव हे घटक राज्याच्या प्रशासनाचे मुख्य समन्वयक असतात. मुख्य सचिवांचे नेतृत्व आणि निर्णय हे राज्याच्या प्रशासनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. मुख्यमंत्र्यांच्या कार्यक्षमतेला अधिक चालना देण्यासाठी मुख्य सचिवांच्या कार्यक्षमतेचा मोठा वाटा असतो.

-----------------------------------------------------------------------------------------------

**सारांश**

मुख्यमंत्री कार्यालय हे राज्याच्या प्रशासनाचे हृदय असून ते मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली राज्याच्या प्रगतीसाठी कार्य करते. मुख्यमंत्र्यांनी घेतलेल्या निर्णयांची प्रभावीपणे अंमलबजावणी सुनिश्चित करण्याचे कार्य मुख्यमंत्री कार्यालय करते. हे कार्यालय जनतेशी थेट संवाद साधून जनता व समाज कल्याण साठी कार्य करते. थोडक्यात मुख्यमंत्री कार्यालय हे राज्य सरकारच्या सर्व कामकाजाचे समन्वयक कार्यालय असून राज्याच्या विकासासाठी या कार्यालयाची भूमिका महत्त्वपूर्ण असते. हे कार्यालय मुख्यमंत्र्यांना प्रशासकीय धोरण, योजनांची अंमलबजावणी आणि राज्याच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण सहाय्य करण्याचे कार्य करते. म्हणून असे म्हटले जाते की मुख्यमंत्री कार्यालयाच्या कार्यक्षमतेवरच राज्याच्या प्रशासनाचे यशापयश अवलंबून असते.

## ब.६ राज्यपालांची भूमिका

राज्यपाल हे राष्ट्रपती आणि घटकराज्य यांना सांधणारा महत्त्वाचा दुवा असतात. राष्ट्रपतींचा घटकराज्यातील प्रतिनिधी म्हणून त्यांचे कार्य महत्त्वाचे आहे. राज्यातील शासनाचा कारभार राज्यपालांच्या नावाने चालत असला तरीही प्रत्यक्षात मुख्यमंत्री आणि त्यांचे मंत्रीमंडळच सर्व कार्य करीत असतात. राज्यपालांना प्राप्त असणाऱ्या स्वविवेकाधीन अधिकारांचा वापर ते कसा करतात, यावरून त्या पदाचे महत्त्व ठरत असते. केंद्र सरकारमध्ये सत्ताबदल झाला तरी राज्यपाल बदलले जातात. १९७७ चे जनता पक्षाचे सरकार व १९८० चे काँग्रेस पक्षाचे सरकार आले होते. तसेच २०१४ मध्ये भारतीय जनता पक्षाचे सरकार स्थापन झाले होते. त्यावेळेस विविध राज्यांचे राज्यपाल बदलले गेले होते. यावरून राज्यपाल पद पक्षीय राजकारणातून कार्य करीत आहे, असे दिसून येते.

थोडक्यात, राज्यपाल हे पद नामधारी असले तरीही त्यांना प्राप्त झालेल्या स्वविवेकाधीन अधिकारांमुळे या पदास राज्यांच्या राजकारणात विशेष महत्त्व प्राप्त झालेले आहे. मात्र असे असले तरी राज्यपाल हे पद निष्पक्ष असल्यामुळे या पदावरील व्यक्तीने पक्षीय राजकारणापासून अलिप्त राहून निःपक्षपातीपणे कार्य करणे अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे राज्यपालांनी आपली घटनात्मक जबाबदारी कर्तव्यभावनेने आणि नैतिकतेने पार पाडणे अपेक्षित असते. मात्र वर्तमान काळात राज्यपालांकडून दुर्दैवाने या अपेक्षा पूर्ण होत नाहीत. कारण राज्यपालांची निष्ठा केंद्र सरकारशी बांधिल असल्यासारखे वर्तन अनेकदा या

पदावरील व्यक्तीकडून झालेले आढळून आलेले आहे. उदा. महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, केरळ या घटकराज्यांच्या राज्यपालांची वर्तमान भूमिका. राज्यपाल पदावरील व्यक्तीच्या पक्षपाती भूमिकेमुळे राज्यपाल पद टीकेचे धनी बनलेले आहे.

राज्यपाल हे राष्ट्रपती आणि घटकराज्य यांना सांधणारा महत्त्वाचा दुवा असतात. राष्ट्रपतींचा घटकराज्यातील प्रतिनिधी म्हणून त्यांचे कार्य महत्त्वाचे आहे. राज्यातील शासनाचा कारभार राज्यपालांच्या नावाने चालत असला तरीही प्रत्यक्षात मुख्यमंत्री आणि त्यांचे मंत्रीमंडळच सर्व कार्य करीत असतात. राज्यपालांना प्राप्त असणाऱ्या स्वविवेकाधीन अधिकारांचा वापर ते कसा करतात, यावरून त्या पदाचे महत्त्व ठरत असते. केंद्र सरकारमध्ये सत्ताबदल झाला तरी राज्यपाल बदलले जातात. १९७७ चे जनता पक्षाचे सरकार व १९८० चे काँग्रेस पक्षाचे सरकार आले होते. तसेच २०१४ मध्ये भारतीय जनता पक्षाचे सरकार स्थापन झाले होते. त्यावेळेस विविध राज्यांचे राज्यपाल बदलले गेले होते. यावरून राज्यपाल पद पक्षीय राजकारणातून कार्य करीत आहे, असे दिसून येते.

थोडक्यात, राज्यपाल हे पद नामधारी असले तरीही त्यांना प्राप्त झालेल्या स्वविवेकाधीन अधिकारांमुळे या पदास राज्यांच्या राजकारणात विशेष महत्त्व प्राप्त झालेले आहे. मात्र असे असले तरी राज्यपाल हे पद निष्पक्ष असल्यामुळे या पदावरील व्यक्तीने पक्षीय राजकारणापासून अलिप्त राहून निःपक्षपातीपणे कार्य करणे अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे राज्यपालांनी आपली घटनात्मक जबाबदारी कर्तव्यभावनेने आणि नैतिकतेने पार पाडणे अपेक्षित असते. मात्र वर्तमान काळात राज्यपालांकडून दुर्दैवाने या अपेक्षा पूर्ण होत नाहीत. कारण राज्यपालांची निष्ठा केंद्र सरकारशी बांधिल असल्यासारखे वर्तन अनेकदा या पदावरील व्यक्तीकडून झालेले आढळून आलेले आहे. उदा. महाराष्ट्र, पश्चिम बंगाल,केरळ या घटकराज्यांच्या राज्यपालांची वर्तमान भूमिका. राज्यपाल पदावरील व्यक्तीच्या पक्षपाती भूमिकेमुळे राज्यपाल पद टीकेचे धनी बनलेले आहे. संविधानिकदृष्ट्या राज्यपाल हे पद महत्त्वपूर्ण आहे. राज्यपाल हे पद राष्ट्रपती आणि घटकराज्य यांना जोडणारा एक महत्वाचा दुवा आहे. घटकराज्यातील राष्ट्रपतींचे प्रतिनिधी म्हणून राज्यपालांचे कार्य महत्त्वपूर्ण ठरले आहे. घटकराज्यातील शासनाचा कारभार राज्यपालांच्या नावाने चालत असतो. घटकराज्याचे कार्यकारीप्रमुख म्हणून राज्यपालांचे राज्याच्या राज्यकारभारावर नियंत्रण असते. संविधानात्मकदृष्ट्या राज्यपाल हे राज्याचे कार्यकारीप्रमुख असले तरी प्रत्यक्षात मात्र राज्याची सत्ता मुख्यमंत्री व मंत्रिमंडळाच्या हातामध्ये एकवटलेली असते. म्हणजेच प्रत्यक्षात राज्यपाल हे पद नामधारी स्वरूपाचे बनलेले दिसून येते. मात्र असे असले तरीदेखील राज्यपालांना प्राप्त असणाऱ्या स्वविवेकाधीन अधिकारांचा वापर ते कशाप्रकारे करतात यावरून त्या पदाचे महत्त्व निश्चित होत असते. मात्र अनेकवेळा राज्यपाल हे पद केंद्र सरकारच्या हातातील बाहुले बनलेले आढळून आलेले आहे. राज्यपालांची नियुक्ती राष्ट्रपतींकडून होत असल्यामुळे राष्ट्रपतींची मर्जी असेपर्यंत राज्यपाल पदावर राहू शकतात. यामुळे अनेकवेळा हे निदर्शनास आलेले आहे की, केंद्र सरकारमध्ये सत्तापरिवर्तन झाले की घटकराज्यांचे राज्यपाल बदलले जातात. उदा. १९७७ मध्ये जनता पक्ष आणि १९८० मध्ये इंदिरा काँग्रेस पक्ष तसेच २०१४ मध्ये भारतीय जनता पक्ष सत्तेवर आल्यामुळे भारतातील विविध राज्यांचे राज्यपाल बदलले गेलेले आहेत. यावरून राज्यपाल हे पद पक्षीय राजकारणाचा बळी ठरताना दिसून येते.

राज्यपाल हे राष्ट्रपतींचे घटकराज्यातील प्रतिनिधी म्हणून कार्य करीत असल्यामुळे वेळोवेळी राज्यातील स्थितीचा अहवाल ते राष्ट्रपतींना पाठवत असतात. पक्षीय राजकारणामुळे काहीवेळा घटकराज्याचा कारभार कायदा आणि सुव्यवस्थेनुसार सुरू असला तरीदेखील केंद्र सरकारच्या अप्रत्यक्ष सूचनेनुसार राज्यपाल केंद्रसरकारला अनुकूल अहवाल पाठवून त्या राज्यात राष्ट्रपती राजवटीची शिफारस करू शकतात, असे अनेक उदाहरणांवरून स्पष्ट झालेले आहे. यामुळे राज्यपाल हे पद पक्षीय राजकारणातून कार्य करते, असे स्पष्ट झालेले आहे.

भारतीय संविधानाच्या मसुदा समितीचे सदस्य श्री अल्लादी कृष्णस्वामी हे राज्यपाल पदाबाबत म्हणाले होते की,' राज्यपाल पदावर नियुक्त होणारी व्यक्ती संबंधित घटकराज्याच्या परिस्थितीची जाणीव ठेवून निवडलेली, निर्विवाद योग्यता व चारित्र्यसंपन्न, प्रतिष्ठित असणारी परंतु कोणत्याही पक्षाच्या, गटाच्या राजकारणापासून अलिप्त अशी असावी. राज्यपाल हा राज्यमंत्रिमंडळाचा मित्र व मध्यस्थ असावा. राज्याच्या घटनात्मक प्रमुखपदी असणारी ही व्यक्ती मंत्रिमंडळाला सल्ला देणारी आणि तणावपूर्ण परिस्थितीतून मार्ग काढणारी असावी की, ज्यामुळे घटकराज्याचा राज्यकारभार सुरळीत चालण्यासाठी कोणतीही अडचण राहणार नाही.' तसेच मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्यपाल पदाबाबत म्हणाले होते की,' राज्यपाल हे पद अलंकारात्मक म्हणून जरी मानले असले तरी विशिष्ट परिस्थितीत त्या पदाला अमर्याद अधिकार प्राप्त होतात. अशावेळी हे अधिकार सामंजस्यता व राष्ट्रहिताची जाणीव ठेवून वापरण्याची क्षमता असणारी व्यक्ती त्या पदावर असल्यासच घटनेतील उद्दिष्ट सफल होईल.' थोडक्यात वरील दोन्ही मतांच्या आधारे हे स्पष्ट होते की, राज्यपाल पदावर आरुढ होणारी व्यक्ती ही शुद्ध चारित्र्य, शिक्षण, परिस्थितीची जाणीव, योग्यता तसेच अधिकारांचा वापर करण्याची क्षमता असणारी असावी.

राज्यपाल पदावर कार्य केलेल्या अनेक राज्यपालांच्या कार्याचा आढावा घेतल्यास हे स्पष्ट झालेले आहे की, अनेकदा राज्यपालांचा पक्षीय राजकारणाशी अप्रत्यक्षपणे संबंध आलेला आहे. सत्ताधारी केंद्र सरकारच्या तंत्राने राज्यपालांचे वर्तन घडलेली अनेक उदाहरणे आपल्यासमोर आहेत. घटकराज्यात विधानपरिषद हे सभागृह अस्तित्वात असल्यास या सभागृहातील १/६ सदस्यांची नियुक्ती साहित्य, कला, शास्त्र, शेती, सहकार, विज्ञान या क्षेत्रांमधून राज्यपाल करीत असतात. परंतु प्रत्यक्षात ही नियुक्ती करतांना राज्यपाल केंद्रातील सत्ताधारी राजकीय पक्षाच्या सूचनेचे पालन करतांना दिसून येतात. वास्तवात राज्यविधिमंडळात मागील दाराने प्रवेश मिळवण्यासाठी सत्ताधारी पक्षाने स्वीकारलेला हा एक वाममार्ग म्हणजेच राज्यपालांकडून विधानपरिषदेवर होणारी सदस्यांची नियुक्ती होय. उदा. महाराष्ट्र राज्यात २०२० मध्ये सत्तेत आलेल्या महाविकास आघाडी सरकारने महाराष्ट्राचे राज्यपाल महामहिम भगतसिंह कोशारी यांच्याकडे विधानपरिषदेतील १२ नियुक्त सदस्यांची यादी पाठवूनही अनेक दिवस राज्यपालांनी ही नियुक्ती प्रलंबित आहे. हे राज्यपालांच्या पक्षीय वर्तनाचे एक उत्तम उदाहरण आहे. राज्यपालांच्या अशा कृतीमुळे राज्यपाल हे पद अनेकवेळा राजकीय वादाच्या चक्रात अडकलेले दिसून येते.

राज्यपाल हे पदनामधारी आहे, हे पद केवळ मानसन्मानाचे आहे, राज्यपाल म्हणजे केवळ उत्सवमूर्ती आहेत. राज्यपाल हा केवळ रबरी शिक्का आहे, हे केवळ उच्च वेतनाचे पद आहे तसेच राज्यपाल हे पद अनावश्यक आहे, अशाप्रकारची टीका राज्यपाल पदासंदर्भात

अनेकवेळा केली जाते. परंतु अशी टीका या पदासंदर्भात केली जात असली तरी, राज्यपाल हे पद केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांना जोडणारा एक महत्वाचा दुवा आहे. तसेच केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्या कार्यामध्ये समन्वय तसेच या दोन्ही सरकारमध्ये सुसंवाद साधण्याचे कार्य राज्यपाल करीत असतात, हे दुर्लक्षून चालणार नाही. परंतु यासाठी राज्यपालांनी निपक्षपातीपणे आणि विवेकबुद्धीने निर्णय घेतले पाहिजेत तसेच निर्भीडपणे निर्णय घेऊन मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळ यांच्यामार्फत त्यांची अंमलबजावणीदेखील केली पाहिजे. याशिवाय सत्ताधारी केंद्र सरकारमधील राजकीय नेत्यांनी राज्यपालांवर कोणतेही दडपण आणता कामा नये. कारण घटकराज्यात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी तसेच केंद्र सरकारचा घटकराज्यातील प्रतिनिधी म्हणून राज्याच्या हिताचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी राज्यपाल हे पद महत्त्वाचे आहे. थोडक्यात राज्यपाल हे पद नामधारी असले तरीदेखील त्या पदाला प्राप्त असलेल्या स्वविवेकाधिन अधिकारांचा वापर ते कसे करतात, यावर या पदाचे महत्त्व आणि स्थान हे भारतीय राजकारणात अवलंबून आहे.

---

**सारांश**

घटकराज्याच्या कार्यकारीमंडळामध्ये कार्यकारीप्रमुख म्हणून तसेच राष्ट्रपतींचे घटकराज्यातील प्रतिनिधी म्हणून राज्यपाल हे पद महत्त्वपूर्ण ठरलेले आहे. केंद्र सरकार आणि राज्यसरकार यांच्यात सुसंवाद आणि समन्वय साधण्यासाठी राज्यपाल या पदाची भूमिका महत्त्वपूर्ण ठरलेली आहे. राज्यपाल पदावरील व्यक्तीने पक्षीय राजकारणापासून अलिप्त राहून नि:पक्षपातीपणे प्राप्त असणाऱ्या स्वविवेकाधिन अधिकारांचा वापर केल्यास, या पदाचे महत्त्व भारतीय राजकारणात अधिकच अधोरेखित होईल.

❄❄❄❄❄❄❄

# क) न्यायमंडळ

**घटक रचना:**

क.० उद्दिष्टे/ विषय विवेचन

क.१ न्यायालयाचे स्वातंत्र्य

क.२ 'न्यायवृंद पद्धती'

क.३ न्यायालयीन पुनर्विलोकन

क.४ न्यायालयीन पुनर्विलोकन- अर्थ व व्याख्या

क.५ न्यायालयीन पुनर्विलोकनाचे समर्थन

क.६ न्यायालयीन पुनर्विलोकनाला विरोध किंवा आक्षेप

क.७ न्यायालयीन पुनर्विलोकनाचे महत्त्व

क.८ भारतीय न्यायव्यवस्थेतील हस्तक्षेप

क.९ न्यायालयीन सक्रियता / क्रियाशीलता

क.१० न्यायालयीन सक्रियता- अर्थ व व्याख्या

क.११ न्यायालयीन सक्रियता गुण

क.१२ न्यायालयीन सक्रियता दोष

क.१३ न्यायालयीन सक्रियता महत्त्व

क.१४ सारांश

## क.१ न्यायालयाचे स्वातंत्र्य (Independence of the Judiciary)

लोकशाहीचा कारभार स्थिर व यशस्वी करण्यासाठी न्यायालयीन स्वातंत्र्य आवश्यक असते. नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करणे, राज्यघटनेचे पावित्र्य कायम टिकविणे हे न्यायमंडळाचे प्रमुख कर्तव्य असते. त्यासाठी न्यायमंडळाने स्वतंत्र, नि:ष्पक्षपणे व निर्भिडपणे न्यायदानाचे पवित्र कार्य पार पाडले पाहिजे. न्यायदान करताना न्यायाधिशांवर कोणत्याही प्रकारचे दडपण असता कामा नये. न्यायमंडळाला कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळाच्या प्रभावापासून अलिप्त राहून न्यायदानाचे कार्य करता आले पाहिजे. घटनाकारांनी न्यायालयीन स्वातंत्र्याचे महत्त्व ओळखून राज्यघटनेत काही तरतूदी करून ठेवलेल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे;

१) **न्यायाधीशांच्या नेमणूका:** न्यायाधीशांना निर्भिडपणे, स्वतंत्रपणे न्यायदान करता यावे यासाठी त्यांच्या नेमणूका नि:ष्पक्षपातीपणे व योग्य पद्धतीने होणे आवश्यक असते. न्यायाधीशांची पात्रता राज्यघटनेने निश्चित केलेली आहे. कार्यकारीप्रमुखाकडून न्यायधीशांच्या नियुक्तीची पद्धती सर्वात चांगली मानली जाते.

## क.२ 'न्यायवृंद पद्धती' (Collegium Method)

अलीकडील काळात करण्यात आलेल्या न्यायालयीन सुधारणांमुळे सर्वोच्च आणि उच्च न्यायालयातील न्यायाधीशांची नियुक्ती किंवा बदली करताना 'न्यायवृंद पद्धती' (Collegium Method) अंमलात आणली जाते. न्यायवृंद पद्धती म्हणजे सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली सरन्यायाधीशांसह ज्येष्ठतम पाच न्यायाधीशांची असणारी एक समिती होय. सर्वोच्च आणि उच्च न्यायालयातील न्यायाधीशांची नियुक्ती व बदली करण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयातील न्यायवृंदास आहे. भारतीय न्यायव्यवस्थेमध्ये न्यायवृंद पद्धती ही राज्यघटनेत नमूद केलेली नाही, परंतु सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापिठाच्या निर्णयामधून ती अस्तित्वात आलेली आहे. न्यायाधीशांच्या नियुक्ती संदर्भात १९८१ मधील फर्स्ट जेजस केसच्या न्यायनिवाड्यानंतर सरन्यायाधीशांच्या मतापेक्षा केंद्र सरकारचे मत वरचढ ठरू लागले होते. त्यामुळे १९९३ मधील एडवोकेट असोसिएशन ऑन रेकॉर्ड (सेकंड जेजस) केसच्या संदर्भात ०९ सदस्यीय घटनापिठाच्या निर्णयानंतर न्यायवृंद पद्धती अंमलात येण्यास सुरुवात झाली. भारतीय राज्यघटनेतील तरतुदीनुसार सर्वोच्च आणि उच्च न्यायालयांमधील न्यायाधीशांच्या नियुक्तीसाठी राष्ट्रपतींनी केवळ सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांचीच नव्हे, तर ज्येष्ठतम न्यायाधीशांचीदेखील सहमती घेणे अपेक्षित आहे, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने या केसच्यासंदर्भामध्ये १९९३ मध्ये दिला होता. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे १९९३ नंतर सर्वोच्च आणि उच्च न्यायालयामधील न्यायाधीशांच्या नियुक्तीच्या संदर्भात केंद्र सरकारच्या सहभागाला मर्यादा आलेल्या आहेत. कारण न्यायवृंदानी शिफारस केलेल्या न्यायमूर्तींची गुप्तचर विभागामार्फत (IB) पडताळणी करून अहवाल देणे आणि काही आक्षेप असल्यास तो न्यायवृंदास कळविणे एवढाच केंद्र सरकारचा न्यायाधीशांच्या नियुक्ती संदर्भात सहभाग राहिलेला आहे. न्यायवृंदाने न्यायाधीशांच्या नियुक्ती संदर्भात शिफारस केल्यानुसार अंमलबजावणी करणे आणि तो प्रस्ताव राष्ट्रपतींकडे पाठविणे केंद्र सरकारला बंधनकारक करण्यात आलेले आहे. सुरुवातीला न्यायवृंदामध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशासह दोन वरिष्ठ न्यायाधीशांचा समावेश करण्यात येत होता, परंतु १९९८ मध्ये महामहीम राष्ट्रपतींनी न्यायालयास केलेल्या विनंतीनुसार सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापिठाने न्यायवृंद पद्धतीमध्ये सरन्यायाधीशांसह दोनऐवजी चार ज्येष्ठ न्यायाधीशांचा समावेश केला. तेव्हापासून न्यायवृंदांमध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांसह वरिष्ठ पाच न्यायाधीशांचा समावेश करण्यात आलेला आहे. न्यायाधीशांच्या नियुक्तीसंदर्भात न्यायवृंदाची शिफारस केंद्र सरकारकडे पाठवली जाते. न्यायवृंदानी शिफारस केलेल्या न्यायमूर्तींच्या नियुक्तीची अंमलबजावणी करणे केंद्र सरकारवर बंधनकारक करण्यात आलेले आहे. न्यायाधीशांच्या नियुक्तीमध्ये केंद्र सरकारचा हस्तक्षेप होऊ नये यासाठी न्यायमूर्तींच्या नियुक्त्या व बदल्यांचे सर्वाधिकार सर न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखालील न्यायवृंदाला देण्यात आलेले आहेत. न्याययंत्रणेमधील उच्चस्तरीय न्यायमूर्ती नियुक्तीची प्रक्रिया करणाऱ्या मेमोरंडम ऑफ प्रोसिजर नुसार कायदा मंत्रालयाकडून यासंदर्भात संपर्क झाल्यानंतर निवृत्त होणारे सरन्यायाधीश आपल्या उत्तराधिकाऱ्याच्या नावाची शिफारस देण्याची प्रक्रिया न्यायवृंदांच्या मान्यतेने करीत असतात. वर्तमान न्यायवृंदामध्ये विद्यमान सरन्यायाधीश न्या. संजीव खन्ना (अध्यक्ष) आहेत, तर न्या. भूषण गवई, न्या. सूर्यकांत, न्या. ऋषिकेश रॉय आणि न्या. अभय ओक हे सदस्य आहेत. न्यायवृंदांनी केलेल्या शिफारशीनुसार भारताचे राष्ट्रपती सर्वोच्च आणि उच्च न्यायालयातील न्यायाधीशांची नियुक्ती करतात. सर्वोच्च

न्यायालयातील सरन्यायाधीशांची नियुक्ती करताना सर्वोच्च न्यायालयातील इतर न्यायाधीशांच्या सेवाजेष्ठतेचा विचार केला जातो. सर्वसाधारणपणे न्यायाधीशांच्या सेवाजेष्ठतेनुसार वरिष्ठ न्यायाधीशांची नियुक्ती सरन्यायाधीश पदी करण्यात येते, परंतु दुर्दैवाने याबाबत काही अपवाद घडल्याची उदाहरणे आहेत.

सर्वोच्च आणि उच्च न्यायालयामधील न्यायाधीशांच्या नियुक्तीचे अधिकार राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोगाला देणारी ९९ वी घटनादुरुस्ती केंद्र सरकारने२०१५ मध्ये केलेली होती. ऑगस्ट २०१५ मध्ये लोकसभा आणि राज्यसभेने ९९ वे घटनादुरुस्ती विधेयक एकमताने मंजूर करून न्यायाधीशांच्या नियुक्तीचे अधिकार न्यायवृंदाऐवजी राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोगास देण्यास मंजुरी दिलेली होती. परंतु न्यायवृंद पद्धतीऐवजी राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोगाकडून न्यायाधीशांची नियुक्ती झाल्यास न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य आणि स्वायत्तता धोक्यात येऊ शकते, तसेच राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोगामध्ये केंद्रीय विधी व न्याय मंत्री आणि विधीक्षेत्रातील दोन मान्यवरांचा समावेश करण्याची तरतूद असल्यामुळे न्यायाधीशांच्या नियुक्तींमध्ये केंद्र सरकारचा हस्तक्षेप होईल या कारणामुळे न्यायव्यवस्थेत केंद्र सरकारचा हस्तक्षेप होऊ नये, यासाठी या घटनादुरुस्तीला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेली होती. १६ ऑक्टोबर २०१५ रोजी सर्वोच्च न्यायालयातील न्या. जे. एस. केहर, न्या. मदन लोकूर, न्या. कुरियन जोसेफ, न्या. जस्ती चलेमेश्वर आणि न्या. आदर्शकुमार गोयल या पाच सदस्यीय घटनापिठाने ४:१ अशा बहुमताने अवैध ठरवली. पाच सदस्यीय घटनापिठातील न्या. जे. एस. केहर, न्या. मदन लोकूर, न्या. कुरियन जोसेफ आणि न्या. आदर्शकुमार गोयल यांनी बहुमताने ही घटनादुरुस्ती रद्द केली, तर न्या. जस्ती चलेमेश्वर यांनी ती वैध ठरविली होती. अशाप्रकारे सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे न्यायवृंद पद्धतीवर बहुमताने शिक्कामोर्तब झाले. त्यामुळे न्यायाधीशांच्या नियुक्तीचा अधिकार आपल्याकडे घेण्याचा केंद्र सरकारचा प्रयत्न अयशस्वी झाला. या न्यायवृंदांनी केलेल्या शिफारशीनुसार भारताचे राष्ट्रपती सर्वोच्च आणि उच्च न्यायालयातील न्यायाधीशांची नियुक्ती करतात. परंतु तरीसुद्धा सत्ताधारी पक्ष न्यायाधीशांच्या नेमणूकीत हस्तक्षेप करून पक्षाला अनुकूल असणाऱ्या 'होयबा' व्यक्तीची न्यायाधीशपदी नियुक्ती करताना आढळतात. त्यामुळे न्यायालयाच्या स्वातंत्र्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित होण्याचा धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

१) **न्यायाधीशांची पात्रता:** पात्र व कार्यक्षम न्यायाधीशांकडूनच न्यायालयाचे स्वातंत्र्य सुरक्षित ठेवले जाते. राज्यघटनेत सर्वोच्च न्यायालयांपासून कनिष्ठ न्यायालयांच्या न्यायाधीशांची पात्रता कोणती असावी यासंदर्भात तरतूद केलेली आहे. राज्यघटनेने अकार्यक्षम, अपात्र न्यायाधिशांना काढून टाकण्याची तरतूद केलेली आहे, मात्र न्यायाधीशांची नियुक्त करतानाच दक्षता घेतल्यास पदच्युतीचा प्रश्नच उद्भवणार नाही.

२) **न्यायाधीशांचा कार्यकाल व सेवा शाश्वती :** न्यायाधीशांना संविधानाने कार्यकालाची हमी दिलेली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश वयाच्या ६५ वर्षांपर्यंत, तर उच्च न्यायालयाचे न्यायाधीश वयाच्या ६२ वर्षांपर्यंतअधिकारपदावर राहतात. तत्पूर्वी ते स्वेच्छेने राजीनामा देऊ शकतात. परंतु गैरवर्तन किंवा अकार्यक्षमतेच्या कारणांवरून महाभियोगाच्या प्रक्रियेने न्यायाधीशांना पदच्युत करता येऊ शकते. परंतु ही पद्धती अतिशय कठिण स्वरूपाची असल्यामुळे त्यांना आकसबुद्धीने किंवा मुद्दाम पदावरून काढता येत नाही.

३) **न्यायाधीशांचे वेतन, भत्ते व सोयीसुविधा:** न्यायालयाचे स्वातंत्र्य सुरक्षित ठेवण्यासाठी न्यायाधीशांना भरपूर वेतन, भत्ते व सवलती दिल्या जातात. कारण वेतन भरपूर असल्यास न्यायाधीश पैशांच्या अमिषांना बळी पडणार नाहीत. भरपूर वेतन, भत्ते, सोयीसुविधांमुळे कार्यक्षम, निष्णात, कायदेतज्ज्ञ अशा व्यक्ती या पदाकडे आकर्षिल्या जातात.

४) **निवृत्तीनंतर पद नसाये :** न्यायालयाचे स्वातंत्र्य सुरक्षित ठेवण्यासाठी न्यायाधीशांना निवृत्तीनंतर कोणतेही पद देण्यात येऊ नये. निवृत्त न्यायाधीशांना कोणत्याही न्यायालयात वकिली करता येणार नाही, अशी तरतूद राज्यघटनेत केलेली आहे. परंतु सरकार सेवानिवृत्त न्यायाधीशांना विविध चौकशी आयोगावर नेमू शकते. मात्र न्यायालयीन स्वातंत्र्य सुरक्षित ठेवण्यासाठी अशा स्वरूपाची पदे निवृत्त न्यायाधीशांना देण्यात येऊ नयेत, अशी तरतूद राज्यघटनेत दुरुस्ती करून करणे आवश्यक बनलेले आहे. कारण सर्वोच्च न्यायालयातील एका निवृत्त सरन्यायाधिशांना राज्यसभेचे सदस्यत्व देण्यात आल्यामुळे अशा न्यायाधिशांच्या न्यायिक निष्ठा व प्रामाणिकपणाबाबत शंका उपस्थित होत आहेत.

५) **न्यायाधीशांचा स्वाभिमान व न्यायालयाची निरोगी परंपरा :** न्यायाधीशांचा स्वाभिमान आणि न्यायालयांच्या निरोगी परंपरा जेवढ्या जास्त प्रमाणात जोपासल्या जातील, तेवढ्या जास्त प्रमाणात न्यायालयीन स्वातंत्र्य सुरक्षित राहू शकते. न्यायाधीशांनी नि:ष्पक्षपातीपणे, निस्पृह आणि स्वतंत्र वृत्तीने शासनाच्या दबावाला बळी न पडता न्यायबुद्धीने निवाडा केल्यास न्यायालयाचे स्वातंत्र्य सुरक्षित राहते.

६) **न्यायालयीन विलंब:** न्यायव्यवस्थेत न्यायाधीशांची अनेक पदे रिक्त असल्यामुळे न्यायालयीन निर्णयास विलंब लागतो. अतिविलंबाने न्याय देणे म्हणजे न्याय नाकारणे, न्यायालयीन स्वातंत्र्य जोपासताना न्यायाधीशांच्या नियुक्तीला जेवढे महत्त्व आहे, तेवढेच महत्त्व न्यायाधीशांची रिकामी पदे भरून प्रलंबित असंख्य अनिर्णित प्रकरणे निकालात काढणे यालाही आहे.

७) **न्यायाधीशांचा अवमान** करणे हा गुन्हा समजला जातो. अवमान झाला आहे की नाही हे ठरवणे तसेच गुन्हा झाला असल्यास त्यासाठी काय शिक्षा करायची हे ठरविण्याचा अधिकार न्यायालयाला असतो.

## क.३ न्यायालयीन पुनर्विलोकन (Judicial Review)

भारतीय संविधानामध्ये न्यायालयीन पुनर्विलोकनाची संकल्पना अमेरिकेच्या संविधानामधून स्विकारलेली आहे. अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश सर जॉन मार्शल यांनी १८०३ मध्ये मार्बरी विरुद्ध मेडिसन खटल्याचा निर्णय देताना न्यायालयीनपुनर्विलोकनाची संकल्पना स्पष्ट केली होती. त्यानंतर १८१९ मध्ये मॅकलॉक विरुद्ध मेरीलैंड या खटल्याच्या निकालाद्वारे अमेरिकेच्या सर्वोच्च मानकताक व्यायालयीन पुनर्विलोकनाच्या संकल्पनेचे अधिक स्पष्टीकरण केले होते. भारताने अमेरिकेच्या संविधानामधून न्यायालयीन पुनर्विलोकनाची संकल्पना स्विकारलेली असली, तरी भारतीय न्यायालयीन पुनर्विलोकनाचे स्वरूप मात्र अमेरिकेपेक्षा वेगळे आहे. कारण अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाला जेवढ्या

प्रमाणात न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार देण्यात आलेला आहे, तेवढ्या प्रमाणात भारताच्या सर्वोच्च न्यायालयाला हा अधिकार देण्यात आलेला नाही. म्हणजेच अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाला अमर्याद स्वरूपाचा न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार देण्यात आलेला आहे. परंतु भारताच्या सर्वोच्च न्यायालयाला देण्यात आलेला न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार मर्यादित स्वरूपाचा आहे. भारतातील सर्वोच्च आणि उच्च न्यायालयांना न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार देण्यात आलेला असला तरीही भारतीय राज्यघटनेमध्ये न्यायालयीन पुनर्विलोकनाचा कोठेही स्पष्टपणे उल्लेख करण्यात आलेला नाही. परंतु भारतीय संविधानाच्या कलम १३, ३२, १३१, १३२, २२६ नुसार भारतातील सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाला न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार प्राप्त झालेला आहे.

## क.४ न्यायालयीन पुनर्विलोकन- अर्थ व व्याख्या (Judicial Review-Meaning and Definition)

न्यायालयीन पुनर्विलोकन म्हणजे काय? हे समजून घेण्यासाठी काही अभ्यासकांनी किंवा विचारवंतांनी केलेल्या पुढील व्याख्या समजून घेणे क्रमप्राप्त ठरते;

**१) जॉन मार्शल** (अमेरिकेचे सरन्यायाधीश) यांच्या मते,

"न्यायालयीन पुनर्विलोकन म्हणजे कायदेमंडळाने केलेले कायदे आणि कार्यकारी व प्रशासकीय मंडळांनी केलेल्या कृती राज्यघटनेशी सुसंगत आहेत किंवा नाहीत यासंबंधी सर्वोच्च न्यायालयाला निर्णय देण्याचा प्राप्त झालेला अधिकार होय."

**२) स्टोरी** यांच्या मते,

"न्यायालयीन पुनर्विलोकन म्हणजे कायद्याचा अर्थ घटनात्मक दृष्टिकोनातून लावणे तसेच जे कायदे राज्यघटनेला सुसंगत नसतील असे कायदे घटनाबाह्य समजून रद्द करणे होय."

**३) पिनॉक आणि स्मिथ** यांच्या मते,

"न्यायालयीन पुनर्विलोकन म्हणजे न्यायालयाचा असा अधिकार की, जो राज्यघटना स्पष्ट करतो तसेच कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ किंवा प्रशासनाद्वारे तयार करण्यात आलेले कायदे किंवा कृती राज्यघटनेविरुद्ध असल्याचे स्पष्ट झाल्यास असंविधानिक म्हणून घोषित करण्यात येतो."

**४) एम. व्ही. पायली** यांच्या मते,

"पुनर्विलोकन म्हणजे न्यायालयाचा असा अधिकार की, ज्या अधिकाराद्वारे कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळाच्या कार्याची संविधानिकता किंवा असंविधानिकता घोषित करण्यात येते."

**५) ब्राऊन आणि मॅक्रिडिस** यांच्या मते,

"न्यायालयीन पुनर्विलोकन म्हणजे न्यायाधीशांना असणारा असा अधिकार की, ज्या अधिकारानुसार न्यायाधीश कायदेमंडळाने केलेला कायदा तसेच कार्यकारी मंडळाने केलेली कृती यांची व्याख्या करू शकतात. तसेच त्यानंतर जर राज्यघटनेशी ते विसंगत आढळून आले, तर त्या कायद्याला किंवा कृतीला असंविधानिक म्हणून घोषित करू शकतात."

**६) एल. पी. बर्थ** यांच्या मते,

"न्यायालयीन पुनर्विलोकन म्हणजे शासनसंस्थेच्या कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ या शाखांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात केलेल्या कृती राज्यघटनेच्या पातळीवर योग्य आहेत किंवा नाहीत, हे पडताळून पाहण्याचा न्यायमंडळाचा अधिकार होय."

७) "कायदेमंडळाने केलेला कायदा किंवा कार्यकारी मंडळाचा एखादा निर्णय राज्यघटनेशी सुसंगत आहे किंवा नाही यासंबंधी निर्णय देऊन तो कायदा किंवा निर्णय घटनाबाह्य म्हणून घोषित करण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा अधिकार म्हणजे न्यायालयीन पुनर्विलोकन होय.

९) "न्यायालयीन पुनर्विलोकन म्हणजे सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाने शासकीय व्यवहाराच्या कायदेशीरपणाची केलेली समीक्षा होय."

वरील व्याख्यांमधून न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अर्थ स्पष्ट होण्यास मदत होते. न्यायालयीन पुनर्विलोकन हे भारतीय न्यायव्यवस्थेचे कल्याणकारी राज्यासंबंधीचे तत्व आहे. भारतामध्ये राज्यघटना सर्वश्रेष्ठ आहे. या राज्यघटनेनुसार करण्यात येणारा कायदा घटनात्मक आहे किंवा नाही, हे ठरविण्याचा अधिकार तसेच कायद्याची घटनात्मकता तपासण्याचा अधिकार न्यायालयीन पुनर्विलोकनाद्वारे न्यायमंडळाला देण्यात आलेला आहे. थोडक्यात न्यायालयीन पुनर्विलोकन हा राज्यघटनेचा अर्थ लावण्याचा एक भाग आहे. भारतात कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळ यांच्याकडून राज्यघटनेशी विसंगत असे वर्तन किंवा कृती घडू नये, यासाठी सर्वोच्च न्यायालयाला न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार देण्यात आलेला आहे.

न्यायालयीन पुनर्विलोकनाला 'न्यायालयीन सिंहावलोकन' असेही म्हटले जाते. कारण कायदेमंडळाने केलेला कायदा किंवा कार्यकारी मंडळाने केलेल्या कृतीकडे न्यायमंडळ न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या अधिकाराद्वारे सिंहाप्रमाणे मागे वळून पाहते आणि त्या कायद्याची किंवा त्या कृतीची योग्य-अयोग्यता पडताळून पाहत असते. कायदेमंडळ तसेच कार्यकारी मंडळाकडून राज्यघटनेशी विसंगत असे नियम किंवा वर्तन घडवू नये म्हणून सर्वोच्च न्यायालयाला न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार देण्यात आलेला आहे. भारतीय राज्यघटनेच्या संरक्षणाची जबाबदारी घटना निर्मात्यांनी न्यायालयावर सोपवलेली आहे. राज्यघटनेने दिलेल्या अधिकारांचा राजकीय नेत्यांनी तसेच राजकीय पक्षांनी गैरवापर करू नये यासाठी राज्यघटनेच्या संरक्षणाची प्रमुख जबाबदारी न्यायालयाने योग्यरीतीने पार पाडावी यासाठी सर्वोच्च न्यायालयाला न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार देण्यात आलेला आहे.

भारतातील सर्वोच्च न्यायालयाला राज्यघटनेच्या कलम ३२ नुसार नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करण्याचा तसेच कलम १३१ व १३२ नुसार केंद्र व घटकराज्याच्या विधिमंडळाने केलेल्या कायद्यांचा पुनर्विचार करण्याचा अधिकार प्राप्त झालेला आहे. थोडक्यात या कलमांच्या माध्यमातून सर्वोच्च न्यायालयाला न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार प्राप्त झालेला आहे. न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या संदर्भात भारतात १९६७ मध्ये गोलकनाथ विरुद्ध पंजाब राज्य खटल्यामध्ये मूलभूत हक्कात कोणताही बदल करण्याचा अधिकार संसदेला नाही, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिलेला होता. त्यानंतर १९७१

मध्ये भारतीय संसदेने केलेल्या २४ व्या घटनादुरुस्तीनुसार संसदेला राज्यघटनेच्या कोणत्याही भागात दुरुस्ती करता येईल, असे स्पष्ट करण्यात आले. त्यानंतर १९७३ मध्ये केशवानंद भारती विरुद्ध केरळ सरकार या खटल्याचा निर्णय देताना सर्वोच्च न्यायालयाने गोलकनाथ विरुद्ध पंजाब राज्य या खटल्याचा निर्णय बदलून तसेच २४ वी घटनादुरुस्ती वैध ठरवून राज्यघटनेची चौकट अबाधित राखूनच संसदेला घटनादुरुस्ती करता येईल, असा महत्त्वपूर्ण निर्णय दिला. त्यानंतर १९७६ मध्ये संसदेने ४२ वी घटनादुरुस्ती करून न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार मर्यादित केला. कारण या घटनादुरुस्तीनुसार केशवानंद भारती विरुद्ध केरळ सरकार या खटल्यातील सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय रद्द ठरवून संसदेला घटनादुरुस्ती करण्याचा अमर्याद अधिकार देण्यात आला. थोडक्यात ४२ व्या घटनादुरुस्तीने ३६८ व्या कलमात ४ व ५ हे उपकलम समाविष्ट करून एखादी घटनादुरुस्ती मूलभूत अधिकाराच्या बाबतीत बेकायदेशीर असल्याचा निर्णयन्यायालय देऊ शकणार नाही, अशी तरतूद करण्यात आली. त्यानंतर १९७८ मध्ये जनता सरकारच्या कार्यकाळात करण्यात आलेल्या ४४ व्या घटनादुरुस्तीनुसार न्यायालयीन पुनर्विलोकनावरील काही बंधने उठविण्यात आली. त्यानंतर १९८० मध्ये सर्वोच्च न्यायालयात मिनव्हा मिल्स विरुद्ध भारत शासन या खटल्याच्या निर्णयामध्ये सर्वोच्च न्यायालयाने ३६८ व्या कलमातील उपकलम ४ व ५ घटनाबाह्य ठरविणारा निर्णय दिला. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या अधिकाराला पुन्हा महत्त्व प्राप्त झाले. थोडक्यात या निर्णयानुसार सर्वोच्च न्यायालयाने घटनादुरुस्ती कायद्याला न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या कार्यकक्षेत आणले. अशाप्रकारे न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या अधिकारावर संसदेने अनेकवेळा मर्यादा टाकण्याचा प्रयत्न केला परंतु त्या दीर्घकाळ राहू शकल्या नाहीत. त्यानंतरच्या काळात मात्र न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या अधिकाराला महत्त्व प्राप्त झालेले आहे.

भारतामध्ये पुढील कायद्याचे न्यायमंडळ न्यायालयीन पुनर्विलोकन करू शकते;

१) संसद व राज्य विधिमंडळाने केलेले कायदे तसेच घटनादुरुस्त्या.

२) भारतीय संघराज्य आणि या संघराज्यातील राज्य आणि राज्याच्याअधिकार क्षेत्रातील अधिकारी यांच्या प्रशासकीय कृती.

३) भारतीय राज्यघटनेच्या कलम १२३ नुसार राष्ट्रपतींना तसेच कलम २१३ नुसार राज्यपालांना वटहुकूम काढण्याचा जो अधिकार आहे, त्या अधिकाराचे न्यायालयीन पुनर्विलोकन केले जाते.

न्यायालयीन पुनर्विलोकनाचा संबंध राज्यघटनेच्या श्रेष्ठत्वासी असून राज्यघटनेचे श्रेष्ठत्व अबाधित ठेवण्याची जबाबदारी न्याय मंडळावर सोपवण्यात आलेली आहे. कोणत्याही देशातील सर्वोच्च न्यायालयाला न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार प्राप्त होण्यासाठी तीन अटींची पूर्तता होणे आवश्यक असते. त्या तीन अटी अशा आहेत; एक-त्या देशाचे संविधान लिखित असणे आवश्यक असते. दोन-त्या देशात संघराज्य पद्धती म्हणजेच केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्यामध्ये अधिकारांची विभागणी होणे आवश्यक आहे. तीन-त्याचप्रमाणे त्या देशाच्या राज्यघटनेमध्ये नागरिकांच्या मूलभूत हक्कांचा समावेश असणे आवश्यक असते. भारतामध्ये वरील तीनही अटींची पूर्तता होत असल्यामुळे जरी स्पष्टपणे

भारतीय संविधानात न्यायालयीन पुनर्विलोकनाचा उल्लेख करण्यात आलेला नसला, तरीदेखील भारतातील सर्वोच्च न्यायालयाला न्यायालयीनपुनर्विलोकनाचा अधिकार प्राप्त झालेला आहे.

## क.५ न्यायालयीन पुनर्विलोकनाचे समर्थन

राज्यशास्त्राच्या विविधअभ्यासक व विचारवंतांनी पुढील मुद्यांच्या आधारे न्यायालयीन पुनर्विलोकनाचे समर्थन केलेले आहे;

१) न्यायालयीन पुनर्विलोकनामुळे भारतीय राज्यघटनेने नागरिकांना दिलेल्या मूलभूत हक्कांचे संरक्षण होते. कायदेमंडळ किंवा कार्यकारी मंडळाकडून नागरिकांच्या मूलभूत हक्कावर आक्रमण झाल्यास न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या अधिकाराद्वारे न्यायालय नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करते.

२) न्यायालयीन पुनर्विलोकनामुळे राज्यघटनेचे पावित्र्य कायम राखले जाते. कारण न्यायमंडळ हे राज्यघटनेचे रक्षक मानले जाते. म्हणून राज्यघटनेतील तत्त्व, नियमांचे रक्षण करण्यामध्ये न्यायालयीन पुनर्विलोकनामुळे न्यायालयाची भूमिका महत्त्वपूर्ण ठरते.

३) न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या अधिकारामुळे भारतातील संघराज्य शासनपद्धतीला स्थैर्य प्राप्त होते. कारण सर्वोच्च न्यायालयाला प्राप्त झालेल्या न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या अधिकाराद्वारे हे न्यायालय घटकराज्याच्या अधिकारांचे रक्षण करीत असते.

४) न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या अधिकारामुळे अल्पसंख्याकांना संरक्षण मिळते. कारण जेव्हा बहुसंख्यांकडून अल्पसंख्याकांवर अन्याय होतो किंवा आक्रमण होते, तेव्हा न्यायालयीन पुनर्विलोकनाद्वारे न्यायालय अल्पसंख्याकांवरील अन्याय दूर करीत असते.

५) न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या अधिकारामुळे कायदेमंडळाकडून योग्य आणि राज्यघटनेशी सुसंगत कायद्यांची निर्मिती होते. कारण न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या अधिकारामुळे कायदेमंडळाकडून राज्यघटनेला विसंगत असणारे कायदे निर्माण केले गेल्यास ते रद्द करण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला प्राप्त झालेला आहे.

## क.६ न्यायालयीन पुनर्विलोकनाला विरोध किंवा आक्षेप

न्यायालयीन पुनर्विलोकनाची चांगली बाजू विचारात घेता या अधिकाराचे समर्थन केले जात असले तरी, राज्यशास्त्राचे काही अभ्यासक आणि विचारवंतांनी खालील मुद्यांच्या आधारे न्यायालयीन पुनर्विलोकनावर आक्षेप घेतलेला आहे;

१) न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या अधिकारामुळे जनतेच्या सार्वभौमत्वावर मर्यादा येतात. कारण कायदेमंडळातील जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींनी केलेले कायदे हे अप्रत्यक्षपणे जनतेने केलेले कायदे असतात. परंतु न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या

अधिकाराद्वारे सर्वोच्च न्यायालय राज्यघटनेशी विसंगतीचे कारण दाखवून असा कायदा रद्द करू शकते.

२) न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या अधिकारामुळे न्यायमंडळाचे महत्व वाढलेले आहे. या अधिकारामुळे कायदेमंडळापेक्षा न्यायमंडळाला अधिक महत्त्व प्राप्त झालेले आहे. कारण कायदेमंडळाने केलेल्या कायद्याची तसेच कार्यकारी मंडळांनी केलेल्या कृतीची वैध-अवैधता ठरवण्याचा अधिकार न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या अधिकारामुळे न्यायमंडळाला मिळालेला आहे.

३) न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या अधिकारामुळे भारतीय संसदेच्या अधिकारावर मर्यादा आल्यामुळे संसदेचे महत्त्व कमी होऊन संसदेला दुय्यम स्थान प्राप्त झालेले आहे.

४) न्यायालयीन पुनर्विलोकनाचे तत्व काहीवेळा प्रतिगामी ठरण्याचा धोका असतो. कारण न्यायाधीश जर सनातनी वृत्ती किंवा परंपरावादी असले, तर असे न्यायाधीश आपल्या मताशी चिकटून राहण्याचा धोका असतो. त्यामुळे अशा न्यायाधीशाकडून देण्यात येणारे निर्णय सामाजिक परिस्थितीशी बदलत्या काळानुसार मिळते-जुळते नसतात. त्याचा फटका पुरोगामी समाजव्यवस्थेला आणि जनतेला बसण्याचा धोका असतो.

५) न्यायालयीन पुनर्विलोकनाचे तत्व व्यक्तीस्वातंत्र्याला पोषक आणि पूरक आहे, असे ठामपणे आपण म्हणू शकत नाही. कारण इंग्लंड आणि फ्रान्स या देशातील सर्वोच्च न्यायालयाला न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार नसतानादेखील तेथील नागरिकांचे अधिकार तसेच स्वातंत्र्य सुरक्षित आहेत.

६) न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या तत्त्वामुळे न्यायाधीश हुकूमशाही वृत्तीने वागण्याचा धोका असतो. कारण भारतात न्यायदान करण्यासाठी न्यायमंडळामध्ये असणाऱ्या घटनापीठामधील न्यायाधीशांच्या बहुमताने निर्णय दिला जातो. उदा. एका ७ सदस्यीय घटनापीठासमोर एखाद्या कायद्याबाबत न्यायालयीन पुनर्विलोकनाचा खटला सुरू असेल आणि या खटल्यामध्ये ४ न्यायाधीश तो कायदा घटनाविरोधी आहे, असे मत मांडणारे आणि ३ न्यायाधीश तो कायदा घटनेशी सुसंगत आहे, असे मत मांडणारे असतील तर, त्याचा अर्थ असा होतो की, एका न्यायाधीशाच्या मतानुसार तो कायदा घटनाबाह्य ठरत असतो. थोडक्यात एक न्यायाधीशदेखील हुकूमशाही वृत्तीने वागण्याचा धोका न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या अधिकारामुळेनिर्माण झालेला आहे. न्यायालय पुनर्विलोकनाच्या न्यायालयाच्या अधिकारामुळे संसदेच्या अधिकारावर गदा घेत असल्याचे मत मांडून विद्यमान उपराष्ट्रपती जगदीश धनखड यांनी सर्वोच्च न्यायालयास 'लक्ष्मण रेषा' पाळण्याचा सल्ला दिलेला आहे.

## क.७ न्यायालयीन पुनर्विलोकनाचे महत्त्व (Importance of Judicial Review)

राज्यशास्त्रामध्ये काही विचारवंत आणि अभ्यासकांनी न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या अधिकाराचे समर्थन केलेले आहे, तर काही अभ्यासक व विचारवंतांनी न्यायालयीन

पुनर्विलोकनाच्या अधिकारावर आक्षेप देखी देखील घेतलेला आहे. मात्र असे असले तरी न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या अधिकाराचे महत्त्व आणि त्याची आवश्यकता आपणास नाकारता येणार नाही. कारण सर्वोच्च न्यायालयाला प्राप्त असणाऱ्या न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या अधिकारामुळे नागरिकांचे मूलभूत हक्क, भारतीय संघराज्यातील घटकराज्यांचे अधिकार तसेच राज्यघटनेतील मूलभूत तत्व यांचे संरक्षण होते. त्याचप्रमाणे न्यायालयीन पुनर्विलोकनाचे तत्व हे भारतातील कल्याणकारी राज्याचा पाया मानला जातो. भारतामध्ये 'कायद्याचे राज्य' प्रस्थापित करण्यासाठीदेखील न्यायालयीन पुनर्विलोकनाचे तत्व अत्यंत महत्त्वपूर्ण ठरलेले आहे. कारण एखादा कायदा किंवा शासनाची एखादी कृती जर राज्यघटनेशी विसंगत असेल, तर न्यायालय न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या अधिकाराद्वारे ती रद्द करू शकते, त्यामुळे भारतात कायद्याचे राज्य निर्माण होण्यास निश्चितच मदत होते. भारतात राज्यघटना सर्वश्रेष्ठ असून राज्यघटनेपेक्षा कोणीही श्रेष्ठ नाही, हे तत्व अबाधित राखण्याच्या दृष्टीनेदेखील न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार महत्त्वपूर्ण आहे. तसेच भारतीय संघराज्यामध्ये म्हणजेच केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्यामध्ये संतुलन राखण्याच्या दृष्टीनेदेखील न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार महत्त्वाचा ठरलेला आहे.

न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या अधिकारामुळे न्यायमंडळाला एक स्वतंत्र अस्तित्व प्राप्त झालेले आहे. कारण या अधिकारामुळे कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळाच्या हस्तक्षेपाशिवाय नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे रक्षण करण्यामध्ये न्यायालयाने महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. न्यायालयीन पुनर्विलोकनाचे तत्व म्हणजे भारतातील कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळ यांच्या कार्यावर नियंत्रण ठेवणारे एक 'घटनात्मक समतोल चक्र' (Balancing wheel of Constitution) आहे. थोडक्यात नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण, राज्यघटनेतील मूलभूत तत्वांचे संरक्षण, घटकराज्यांच्या अधिकारांचे संरक्षण तसेच कायदेमंडळ व कार्यकारी मंडळाकडून राज्यघटनेवरील आक्रमणथांबवण्यासाठी, भारतीय राज्यघटनेची सर्वश्रेष्ठता सिद्ध करण्यासाठी त्याचप्रमाणे भारतातील राजकीय व सामाजिक विकासाचा मार्ग सुकर करण्यासाठी न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार अत्यंत महत्त्वपूर्ण ठरलेला आहे, यात शंका नाही.

## क.८ भारतीय न्यायव्यवस्थेतील हस्तक्षेप (Intervention in the Indian Judiciary)

भारतीय संविधानानुसार भारतीय न्यायव्यवस्था स्वतंत्र आणि स्वायत्त आहे. न्यायव्यवस्थेचा उद्देश नागरिकांना न्याय प्रदान करणे त्यांच्या मूलभूत अधिकारांचे आणि कायद्यांचे संरक्षण करणे हा आहे. न्यायालयाची स्वायत्तता आणि निष्पक्षता हे घटक लोकशाही तसेच न्यायव्यवस्थेच्या कार्यक्षमतेसाठी अत्यंत महत्त्वाचे असतात. लोकशाहीमध्ये न्यायव्यवस्थेची स्वतंत्रता आणि स्वायत्तता हा एक अत्यंत महत्त्वाचा स्तंभ असल्यामुळे न्यायव्यवस्थेची स्वायत्तता आणि स्वातंत्र्य याचा आदर राखला जातो. परंतु असे असले तरी देखील भारतीय न्याय व्यवस्थेमध्ये होणारा हस्तक्षेप हा एक अत्यंत महत्त्वाचा वाद विवादाचा विषय ठरलेला आहे ज्यावर आजपर्यंत अनेकदा चर्चा आणि विचारमंथन झालेले आहे. न्यायालयाच्या कार्यप्रणालीमध्ये राजकीय कार्यकारी आंतरराष्ट्रीय आणि इतर बाह्य शक्तींनी हस्तक्षेप करणे हे लोकशाही आणि न्यायव्यवस्थेच्या स्वातंत्र्य आणि स्वायत्ततेसाठी धोकादायक ठरू शकते.

भारतीय न्यायव्यवस्थेवर विविध स्तरावरून होणाऱ्या हस्तक्षेपामुळे न्यायालयाकडून होणारे न्यायदानाचे कार्य आणि नि:पक्षपातीपणा यावर निश्चितच प्रश्नचिन्ह उभे राहिलेले आहे. भारतीय न्यायव्यवस्थेत होणाऱ्या हस्तक्षेपाचे खालील विविध पैलू आहेत;

१) **राजकीय हस्तक्षेप:** भारतीय संविधानानुसार न्यायमंडळ हे स्वतंत्र असावे आणि त्यामध्ये कोणत्याही राजकीय हस्तक्षेप होता कामा नये. त्याचप्रमाणे न्यायालयांनी केवळ कायद्याच्या आधारावर आणि कोणत्याही बाह्य दबावाशिवाय निर्णय घेणे आवश्यक आहे. परंतु दुर्दैवाने भारतीय न्यायव्यवस्थेतील सर्वात मोठा वाद-विवाद निर्माण करणारा मुद्दा म्हणजे राजकीय हस्तक्षेप हा आहे. अनेकवेळा सरकार आणि राजकीय नेतृत्व करणाऱ्या व्यक्ती न्यायालयाच्या निर्णयांमध्ये हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न करतात. अशा हस्तक्षेपामुळे न्यायालयाचा नि:पक्षपातीपणा आणि स्वतंत्रता धोक्यात येऊन राजकीय हस्तक्षेप व दबावामुळे न्यायाधीशांचा निर्णय प्रभावित होण्याचा धोका निर्माण होऊन न्यायाचे उल्लंघन होऊ शकते. राजकीय हस्तक्षेपाच्या माध्यमातून न्यायालयाच्या निर्णयावर सार्वजनिक पातळीवर दबाव आणणे, न्यायाधीशांच्या नियुक्तीमध्ये हस्तक्षेप करणे इ. च्या माध्यमातून न्यायालयाच्या कामकाजात राजकीय हस्तक्षेप होताना दिसतो.

२) **न्यायाधीशांची नियुक्ती आणि हस्तक्षेप:** भारतीय संविधानानुसार न्यायाधीशांची निवड प्रक्रिया पारदर्शक, निष्पक्ष आणि स्वतंत्र असणे अपेक्षित आहे. न्यायाधीशांच्या नियुक्तीला राजकीय दबावापासून मुक्त ठेवणे आवश्यक आहे. म्हणूनच न्यायाधीशांची निवड करण्यासाठी 'न्यायवृंद पद्धती' (Collegium Method) अस्तित्वात आलेली आहे, ज्या पद्धतीद्वारे न्यायाधीशांची नियुक्ती सरकारी हस्तक्षेपापासून मुक्त ठेवली जातो. परंतु न्यायाधीशांची नियुक्ती न्यायगुरुंधतीमार्फत सर्वोच्च न्यायालयातील वरिष्ठम पाच न्यायाधीशांच्या एका स्वतंत्र समितीने केली जात असली तरी देखील न्यायाधीशांच्या नियुक्ती प्रक्रियेमध्ये सरकार किंवा राजकीय नेते काही वेळा हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे न्यायालयाच्या नि:पक्षपातीपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित होते.

३) **न्यायालयीन पुनर्विलोकन:** न्यायालयीन पुनर्विलोकन हा भारतीय न्यायव्यवस्थेमधील एक अत्यंत महत्त्वाचा स्तंभ आहे. न्यायालयीन पुनर्विलोकनाद्वारे न्यायमंडळ कार्यकारी मंडळाने घेतलेला निर्णय किंवा कायदेमंडळाने केलेला कायदा भारतीय संविधानाशी विसंगत असल्यास संबंधित निर्णय किंवा कायद्याचे पुनरावलोकन करीत असते. त्यामुळे भारतीय नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण तसेच भारतीय संविधानाची अंमलबजावणी सुशिक्षित होते. परंतु न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या अधिकारामुळे न्यायालयाच्या निर्णयावर राजकीय दबाव असल्याचे दिसून येते. जबाबदार न्यायाधीशांचा देखावा असलेले निर्णय आणि त्यामध्ये होणारा राजकीय हस्तक्षेप होण्याची शक्यता न्यायालयीन पुनर्विलोकनामुळे वाढते.

४) **प्रसार माध्यमे:** न्यायमंडळांनी आपल्या निर्णय प्रक्रियेवर प्रसारमाध्यमे किंवा कोणत्याही बाह्य दबावाचा प्रभाव न होऊ देता संविधान आणि कायद्याच्या आधारे स्वतंत्रपणे आणि निपक्षपातीपणे न्यायदान करणे अपेक्षित असते. प्रसार माध्यमे आणि न्यायालय दोहोंचे कार्यक्षेत्र वेगवेगळे असते. परंतु असे असले तरी प्रसारमाध्यमे न्यायालयामधील प्रकरणे किंवा निर्णयांचा प्रक्षिप्तपणे वादविवाद उपस्थित करून न्यायालयाच्या कामकाजात हस्तक्षेप

करण्याचा प्रयत्न करीत असतात. प्रसार माध्यमे याद्वारे जनतेचे मत प्रभावित करून, न्यायालयाच्या निर्णयावर टीका करून न्यायाधीशांच्या स्वायत्ततेवर दबाव आणण्याचा प्रयत्न करतात. यामुळे न्यायालयाच्या आणि नि:पक्षपातीपणावर प्रश्न उपस्थित होतो.

५) **समाज माध्यमे:** न्यायालयाने स्वतंत्र व स्वायत्तपणे संविधान व कायद्याच्या आधारे तसेच कोणत्याही बाह्य दबावाच्या अधीन न राहता निर्णय देणे अपेक्षित असते. परंतु समाज माध्यमांवर न्यायालयीन प्रकरणांची चर्चा केली जाते. अशा चर्चेमुळे न्यायालयाच्या निर्णयावर प्रभाव पडण्याचा धोका असतो. समाज माध्यमांचा न्यायाधीशाच्या निर्णयावर दबाव येऊन होणाऱ्या न्यायदानाच्या नि:पक्षपातीपणावर प्रश्नचिन्ह उभे राहते.

६) **कार्यकारी मंडळ:** भारतीय संविधानानुसार कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ या दोघांचे कार्यक्षेत्र वेगवेगळे आणि स्वतंत्र आहे. संविधानानुसार दोघांनीही परस्परांच्या कार्यात हस्तक्षेप करू नये, असे अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे कार्यकारी मंडळाने न्यायमंडळांने दिलेल्या निर्णयाचा आदर करावा आणि न्यायमंडळाच्या कार्यात हस्तक्षेप करू नये, अशी रास्ता पेक्षा संविधानानुसार आहे. परंतु असे असले तरी देखील कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ यांच्या कार्यक्षेत्राची सीमारेषा अनेक वेळा विवादास्पद ठरलेली आहे. कार्यकारी मंडळ न्यायमंडळाच्या निर्णयावर टीका करताना दिसते तसेच न्यायमंडळ देखील कार्यकारी मंडळाच्या धोरणावर प्रश्न उपस्थित करताना दिसते. त्यामुळे कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ यांच्यात काही वेळा संघर्षाची विवादात्मक परिस्थिती निर्माण होते. यातून दोन्ही संस्थांचे अधिकार आणि मर्यादा धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

७) **आंतरराष्ट्रीय दबाव:** भारतीय संविधानानुसार भारतीय न्यायमंडळ भारतीय संविधानाचे पालन करून न्यायदान करीत असते. त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय कायद्यांची अंमलबजावणी भारतीय संविधानाच्या चौकटीत करण्याचे काम भारतीय न्यायमंडळ करीत असते. परंतु असे असले तरी भारतीय न्यायमंडळावर अनेकवेळा आंतरराष्ट्रीय दबाव असलेला दिसून येतो. आंतरराष्ट्रीय प्रकरणांमध्ये भारताच्या न्यायालयीन निर्णयावर इतर देशांचा किंवा इतर संस्थांचा दबाव येण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे भारतीय न्यायव्यवस्थेच्या स्वायत्ततेवर आणि नि:पक्षपातीपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित होऊ शकते.

---

**सारांश:**

भारतीय न्यायव्यवस्थेत होणारा हस्तक्षेप हा एक अत्यंत गंभीर आणि संवेदनशील मुद्दा आहे. कारण न्यायव्यवस्थेत होणाऱ्या हस्तक्षेपामुळे न्यायदानाची प्रक्रिया, न्यायालयाची कार्यक्षमता, न्यायालयाची स्वायत्तता आणि न्यायालयीन निर्णयामधील नि:पक्षपातीपणा धोक्यात येऊ शकतो. न्यायालयाला स्वायत्तता आणि स्वतंत्रता असणे अत्यंत आवश्यक आहे. कारण न्यायालय स्वायत्त आणि स्वतंत्र असतील तरच ती संविधान आणि कायद्याच्या आधारावर पारदर्शकपणे न्यायदान करू शकतील. न्यायमंडळाच्या निर्णय आणि कार्यक्षमतेवर लोकशाहीची खरी किंमत निश्चित होत असल्यामुळे न्यायव्यवस्थेतील स्वायत्तता, नि:पक्षपातीपणा आणि पारदर्शकता राखणे अत्यंत महत्त्वाचे आहे. म्हणूनच न्यायव्यवस्थेचे कार्य कोणत्याही बाह्य हस्तक्षेपामुळे प्रभावित होऊ नये यासाठी राजकीय

सामाजिक प्रसार माध्यमे आणि इतर कोणत्याही बाह्य दबावांपासून न्यायालय प्रभावित होणार नाही याची खबरदारी घेणे अत्यंत आवश्यक आहे. असे झाले तरच न्यायालय संविधान आणि कायद्याच्या चौकटीत राहून निष्कलंक आणि पारदर्शक निर्णय घेऊ शकतील. थोडक्यात न्यायमंडळाने नि:पक्षपातीपणे, पारदर्शकपणे व अचूकपणे न्यायदानाचे कार्य करण्यासाठी न्यायव्यवस्थेतील हस्तक्षेप टाळून न्यायव्यवस्थेवर प्रतिकूल परिणामकारक हस्तक्षेप करणारे विविध मुद्दे टाळून न्यायालयाच्या स्वतंत्रतेची, स्वायत्ततेची आणि पारदर्शकतेची पाठराखण करणे भारतीय लोकशाहीच्या उज्वल भविष्यासाठी अत्यंत आवश्यक आहे.

## क.९ न्यायालयीन सक्रियता / क्रियाशीलता (Judicial Activism)

लोकशाही शासनपद्धतीमध्ये कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ या शासनाच्या तीन अंगांची भूमिका महत्त्वपूर्ण असते. कायदेमंडळाकडून कायदे निर्मितीचे कार्य केले जाते, तर निर्माण केलेल्या कायद्यांची अंमलबजावणी करण्याचे कार्य कार्यकारी मंडळ करीत असते. तसेच कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळाने केलेल्या कायद्यांची वैध अवैधता तपासण्याचे कार्य, नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे तसेच राज्यघटनेचे संरक्षण करण्याचे कार्य न्यायमंडळ करीत असते. म्हणजेच लोकशाहीमध्ये कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ या शासनाच्या तीन शाखांमध्ये सत्ता संतुलन साधलेले असते. शासनाच्या या तीन शाखांपैकी एखाद्या शाखेने आपले कार्य योग्य रीतीने पूर्ण न केल्यास सत्ता संतुलन ढासळते किंवा तेथे एक पोकळी निर्माण होते. निर्माण झालेली ही पोकळी किंवा कार्याची उणीव भरून काढण्याचे कार्य शासनाची इतर शाखा करीत असते. यामधूनच 'न्यायालयीन सक्रियता' ही संकल्पना उदयास आलेली आहे. थोडक्यात लोकशाहीमध्ये बदलत्या परिस्थितीनुसार कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळाने आपली जबाबदारी योग्यरीत्या पार न पाडल्यामुळे तेथे न्यायमंडळाला हस्तक्षेप करावा लागलेला आहे, यातूनच न्यायालयीन सक्रियतेचा उदय झालेला आहे. म्हणजेच कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळाने आपली जबाबदारी व्यवस्थितपणे पार न पाडल्यामुळे न्यायालयीन सक्रियता उदयास आलेली आहे. इंग्लंड आणि अमेरिकेमध्ये न्यायालयीन सक्रियतेची संकल्पना सर्वप्रथम उदयास आली.

## क.१० न्यायालयीन सक्रियता- अर्थ व व्याख्या (Judicial Activism- Meaning and Definition)

आधुनिक काळात भारतात न्यायालयीन सक्रियता हा न्यायालयीन निर्णय प्रक्रियेचा एक महत्त्वाचा भाग बनलेला आहे. न्यायालयीन सक्रियता म्हणजे नेमके काय ? हे समजून घेण्यासाठी पुढील काही व्याख्यांचा अर्थ समजून घेणे क्रमप्राप्त ठरते;

१) **उपेंद्र बक्षी** यांच्या मते, "मानवी हक्क आणि सामाजिक कल्याणासाठी सार्वजनिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी न्यायालयाने प्रभावी भूमिका बजावणे म्हणजे न्यायालयीन सक्रियता होय."

२) **न्या. वारीयावा** यांच्या मते, "अस्तित्वात असलेल्या कायद्यांचा नव्याने निर्माण झालेल्या परिस्थितीनुसार अर्थ लावणे म्हणजे न्यायालयीन सक्रियता होय."

३) **Black's Law Dictionary** मध्ये न्यायालयीन सक्रियतेची व्याख्या पुढीलप्रमाणे केलेली आहे; "Philosophy for judicial decision-making whereby judges allow their personal views about public policy, amount other factor, to guide there decision."

४) **न्या. डी.पी. मदन** यांच्या मते, "न्यायालयीन सक्रियता म्हणजे घटनात्मक व्यवस्थेचे पुनरुज्जीवन करण्याचा एक प्रयत्न होय."

५) "राज्यघटनेमधील कलमांचा काटेकोर अर्थ न लावता लवचिक भूमिकेतून बदलत्या परिस्थितीनुसार न्यायदान करणे म्हणजे न्यायालयीन सक्रियता होय."

६) "न्यायालयीन सक्रियता म्हणजे न्यायमंडळाद्वारे आपल्या परंपरागत अधिकारक्षेत्राबाहेर जाऊन जनहित व समाजहिताच्या दृष्टीने कायदेमंडळ तसेच कार्यकारी मंडळाच्या कार्यात हस्तक्षेप करणे होय."

७) "न्यायालयीन सक्रियता म्हणजे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थितीच्या परिवर्तनाच्या अनुषंगाने न्यायालयांनी आपल्या पारंपारिक भूमिकेत बदल करून जनहितासाठी स्वतःहून पुढाकार घेणे आणि खटला दाखल करणे होय."

८) "जेव्हा एखादे न्यायालय राज्यघटनेतील तत्त्वांना अथवा कायद्यांना बदलत्या परिस्थितीनुसार सातत्य देण्याचा प्रयत्न करते, तेव्हा न्यायालयाच्या या कृतीस न्यायालयीन सक्रियता असे म्हणतात."

९) "सामाजिक, आर्थिक न्याय सर्वांना समानतेवर मिळण्यासाठी न्यायमंडळाने कायद्याचा परंपरागत अर्थ बाजूला सारून दिलेला नवीन निर्णय म्हणजे न्यायालयीन सक्रियता होय."

१०) "कायदेमंडळाने व कार्यकारीमंडळाने आपली विशिष्ट भूमिका पार न पाडल्यास त्यांना त्यांचे विशिष्ट कार्य करण्यास भाग पाडणे हे न्यायालयाच्या न्यायालयीन सक्रियतेत येते."

वरील व्याख्येमधून स्पष्ट होते की, कायदेमंडळ तसेच कार्यकारी मंडळाच्या निष्क्रितेवर न्यायालयीन सक्रियता हा एक महत्त्वाचा उपाय आहे. भारताच्या संदर्भात न्यायालयीन सक्रियतेचा विचार करता स्पष्ट होते की, कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळ आपली जबाबदारी योग्य पद्धतीने पार पाडीत नसल्यामुळे 'न्यायालयीन सक्रियता' ही संकल्पना भारतात उदयास आलेली आहे. साधारणपणे १९८० च्या दशकामध्ये न्यायालयीन सक्रियता ही संकल्पना विकसित झाली. न्यायालयीन सक्रियता या संकल्पनेचा वापर सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय आणि जिल्हा व सत्र न्यायालयाने केलेला आहे.

सामाजिक न्यायाच्या व हिताच्या दृष्टीने न्यायसंस्थेला अनेकवेळा सक्रिय भूमिका स्विकारावी लागते. कायदेमंडळ किंवा कार्यकारी मंडळाच्या निष्क्रियतेमुळे अशी कृती न्यायमंडळाला करावी लागते. कायद्यामधील विविध तरतुदींचे अर्थसामाजिक, राजकीय आणि आर्थिक परिस्थितीच्या संदर्भामध्ये बदलत असतात, परंतु अशा परिस्थितीतही राज्यकर्ते किंवा

राजकीय पक्ष आपले व आपल्या गोटातील लोकांचे हितसंबंध जोपासण्यासाठी बहुजनांवर अन्याय करणारे निर्णय घेत असतात किंवा कृती करीत असतात, म्हणून त्यांच्या निष्क्रियतेवर उपाय म्हणून न्यायालयीन सक्रियतेचा उदय झालेला आहे. लोकांना समानतेची, न्यायाची वागणूक मिळून सामाजिक शुद्धीकरण आणि जनताभिमुख लोकराज्य निर्माण करण्यासाठी न्यायालयीन सक्रियता आवश्यक बनलेली आहे. थोडक्यात सर्वसामान्य जनता व समाजहिताच्या दृष्टीने राज्यघटनेचा वापर फारसा केला जात नाही, ही दुर्दैवाने आजची वस्तुस्थिती आहे. म्हणून सामाजिक न्याय, सामाजिक हित आणि समानता प्रस्थापित करण्यासाठी न्यायसंस्थेकडून सक्रियपणे भूमिका बजावण्याची अपेक्षा व्यक्त केली जाते. त्यातूनच न्यायालयीन सक्रियतेला महत्त्व प्राप्त झालेले आहे.

न्यायाधीश जेव्हा बदलत्या परिस्थितीत कायद्यांचा अर्थ स्पष्ट करतात, तेव्हा न्यायाधीशांच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक इ. विचारांचा प्रभाव ते देत असलेल्या निर्णयावर पडत असतो. साहजिकच अशावेळी न्यायालयाकडून देण्यात येणारे निर्णय हे यांत्रिकपणे घेतलेले नसतात, तर न्यायालयीन प्रक्रियेमध्ये सृजनशीलतेचाही त्यामध्ये समावेश असतो. म्हणजेच न्यायाधीश राज्यघटनेमधील किंवा कायद्यामधील ज्या तरतुदी असतात, त्या तरतुदीमधील त्रुटी भरून काढण्यासाठी आपल्या ऐच्छिक स्वातंत्र्याचा वापर करून बदलत्या परिस्थितीच्या संदर्भात त्याला अर्थ प्राप्त करून देत असतात. भारतीय सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाने कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळाच्या अकार्यक्षमतेवर वेळोवेळी टीका करून न्यायालयीन सक्रियतेचे उदाहरण दिलेले आहे. न्यायालय सक्रिय असल्यामुळे न्यायमंडळ सामाजिक आणि प्रशासकीय कार्यक्रम नियमित करण्यामध्ये कायदेमंडळ तसेच कार्यकारी मंडळापेक्षा प्रभावी भूमिका बजावित आहे. उदा. आग्रा सुरक्षागृह खटला, गंगा नदी प्रदूषण खटला, ताजमहल प्रदूषण खटला इ. अशा विविध खटल्यामध्ये न्यायालयाने न्यायालयीन सक्रियता स्पष्टपणे दाखवलेली आहे. न्यायालयीन सक्रियतेला जनतेचा मोठ्या प्रमाणात मिळणारा पाठिंबा विचारात घेऊन भारतीय न्यायमंडळाने राजकारणातील आणि समाजकारणातील अनिष्ट प्रवृत्ती नष्ट करण्यासाठी स्वतःहून खटले दाखल करून घेण्यास सुरुवात केलेली आहे. त्यामुळे न्यायालयीन सक्रियतेचा वेग वाढलेला दिसून येतो. शासनाचा बेजबाबदारपणा, नोकरशाहीची दप्तरदिरंगाई, कायद्यामधील उणिवा, कायदेमंडळ व कार्यकारी मंडळाची निष्क्रियता इत्यादीमुळे न्यायालयीन सक्रियतेची भूमिका महत्त्वपूर्ण ठरत आहे. न्यायालय सक्रिय असल्यामुळे समाजहितास बाधकठरणारे कायदे रद्द करणे, जनहितासाठी शासनाला न्यायालयाकडून शासनाला आदेश देणे, प्रशासनास समाजहिताचे कार्य करण्यास उद्युक्त करणे, सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेसाठी शासनास आदेश देणे इ. प्रकारच्या कृती न्यायालयीन सक्रियतेअंतर्गत न्यायमंडळाकडून करण्यात आलेल्या आहेत.

## क.११ न्यायालयीन सक्रियता गुण

न्यायालयीन सक्रियता हा आधुनिक काळात न्यायमंडळाचा एक महत्त्वाचा घटक बनलेला आहे. त्यामुळे न्यायालयीन सक्रियतेचे काही गुण पुढीलप्रमाणे सांगता येतील;

१) न्यायालयीन सक्रियतेमुळे मानवी हक्कांची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्यास मदत होते.

२) न्यायालयीन सक्रियतेमुळे न्यायदानाची प्रक्रिया अधिक गतिमान होते.

३) न्यायालयीन सक्रियतेमुळे सामाजिक हित साधण्यास तसेच सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यास मदत होते.

४) नागरिकांना प्राप्त झालेल्या मूलभूत हक्कास न्यायालयीन सक्रियतेमुळे संरक्षण प्राप्त होते.

५) न्यायालयीन सक्रियतेमुळे न्यायमंडळ शासनाला समाजहिताच्या दृष्टिकोनातून आदेश देते.

६) न्यायालयीन सक्रियतेमुळे जनतेचा न्यायव्यवस्थेवर विश्वास वाढतो.

७) न्यायालयीन सक्रियतेमुळे प्रशासनावर नियंत्रण प्रस्थापित होते.

८) न्यायालयीन सक्रियतेमुळे कायद्यामधील उणिवा दूर होण्यास मदत होते.

९) न्यायालयीन सक्रियतेमुळे समाजातील दुर्बल घटकांना न्यायालयाचा भक्कम आधार प्राप्त होतो.

१०) न्यायालयीन सक्रियतेमुळे लोकशाहीची प्रमुख मूल्य व्यवहारात आणली जातात.

११) न्यायालयीन सक्रियतेच्या माध्यमातून संविधानाचे संरक्षण होते, राजकीय व्यवस्थेचे व प्रशासनाचे कार्य संविधानाच्या चौकटीतच चालते की नाही, यामध्ये न्यायव्यवस्था कार्यालयीन सक्रियतेने हस्तक्षेप करू शकते.

१२) भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून व्यक्तीला मिळालेल्या मूलभूत हक्कांच्या रक्षणाची जबाबदारी कलम ३२नुसार न्यायव्यवस्थेवर आहे. त्यामुळे न्यायालय व्यक्तीच्या मूलभूत हक्कांचा संरक्षक ठरते. ही भूमिका पार पाडताना न्यायालयाला न्यायालयीन सक्रियता दाखवावी लागते.

१३) कायदेमंडळ, कार्यकारीमंडळ आपल्या विशिष्ट जबाबदाऱ्या पार पाडण्यास टाळाटाळ करत असल्यास न्यायालयाला सक्रियता दाखवत हस्तक्षेप करावा लागतो. कायदेमंडळ व कार्यकारी मंडळास विशिष्ट कार्य पार पाडण्यात भाग पाडावे लागते.

१४) अलीकडच्या काळात जनहित याचिका मोठ्या प्रमाणात मांडल्या जातात. सार्वजनिक हिताचा विचार करून न्यायालयाला सक्रियता दाखवत अशा जनहित याचिकांचा न्यायनिवाडा करावा लागतो.

१५) न्यायालयीन सक्रियतेच्या माध्यमातून राजकीय व्यवस्थेतील भ्रष्टाचार, दप्तर दिरंगाई यांसारख्या दोषांचे निराकरण करण्यासाठी न्यायालय राज्यव्यवस्थेला आदेश देऊ शकते.

१६) न्यायालय गरजेनुसार कायदेमंडळाला उपदेश करून समाजोपयोगी कायदा निर्माण करण्याचे सांगू शकते अशा प्रसंगी न्यायालय आपली सक्रियाता दाखवू शकते.

## क.१२ न्यायालयीन सक्रियता दोष

न्यायालयीन सक्रियतेच्या संकल्पनेमध्येवरील काही गुण दिसून येत असले, तरी ह्या संकल्पनेमध्ये पुढील दोष किंवा उणिवा दिसून येतात;

१) न्यायालयीन सक्रियतेमुळे कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ यांच्यामधील सत्ता संतुलन ढासळते.

२) न्यायालयीन क्रियाशीलतेमुळे कायदेमंडळाच्या मनोबलावर विपरीत परिणाम होतो. कारण न्यायालयीन सक्रियतेमुळे न्यायमंडळ कायदेमंडळाच्या कार्यात हस्तक्षेप करते.

३) न्यायालयीन सक्रियतेमुळे न्यायमंडळावर न्यायदानाचा अतिरिक्त ताणवाढलेला आहे.

४) न्यायालयीन सक्रियतेमुळे प्रशासकीय अधिकाऱ्यांचे मनोचल कमी होते.

५) न्यायालयीन सक्रियतेमुळे न्यायमंडळाची हुकूमशाही वृत्ती वाढते.

६) न्यायालयीन सक्रियतेमुळे कायदेमंडळ व कार्यकारी मंडळाची जनमानसातील प्रतिमा मलिन होते.

७) न्यायालयीन सक्रियतेमुळे जनतेच्या सार्वभौमत्वास धोका निर्माण होतो.

८) न्यायालयीन सक्रियतेमुळे न्यायमंडळाचे महत्त्व अवाजवीपणे वाढते.

९) न्यायालयीन सक्रियतेचा अतिरेकी वापर केल्यामुळे न्यायमंडळाचे महत्त्व अधिक वाढताना दिसते.

१०) कायद्याचा अर्थ लावण्याची जबाबदारी न्यायमंडळाची असल्याने कायद्याच्या बाबतीत न्यायालयाची हुकूमशाही निर्माण होऊ शकते.

११) कायदेमंडळ व कार्यकारीमंडळाच्या कार्यामध्ये न्यायालय अतिरेकी हस्तक्षेप करू शकते त्यामुळे कायदेमंडळ व कार्यकारीमंडळ यांना काम करताना अडथळे निर्माण होतील.

१२) न्यायालयाने न्यायालयीन सक्रियतेचा अधिक वापर केल्यामुळे सत्ता विभाजनाचे सूत्र असंतुलित होऊ शकते त्यामुळे सत्ता विभाजन धोक्यात येऊ शकते.

१३) कायदेमंडळ व कार्यकारीमंडळाचे महत्त्व कमी होऊन अधिकारांच्या बाबतीत न्यायालयाकडे झुकते माप होताना दिसते.

१४) न्यायालयीन सक्रियतेच्या नावाखाली न्यायमंडळावर कामाचा ताण वाढेल. त्यामुळे त्यांचे प्रमुख न्यायनिवाडा करण्याचे काम याकडे दुर्लक्ष होईल त्याचा परिणाम न्यायप्रक्रियेत दिरंगाई निर्माण होऊ शकते.

१५) राज्यघटनेच्या कलमांचा अर्थ लावण्याची जबाबदारी न्यायमंडळाची असल्याने राज्यघटनेच्या मूळ अर्थास तडा जाऊ शकतो. राज्यघटनेच्या नियमांचा चुकीचा अर्थ काढला जाऊ शकतो.

न्यायालयीन सक्रियतेमध्ये असणाऱ्या वरील काही दोष किंवा उणिवांमुळे न्यायालयीन सक्रियतेला नानी पालखीवाला यांनी एक प्रकारची 'न्यायमंडळाची हुकूमशाही' असे म्हटलेले आहे.

## क.१३ न्यायालयीन सक्रियता महत्त्व

१९८० नंतर च्या दशकात न्यायालयीन सक्रियतेची संकल्पना अधिक व्यापक प्रमाणात वापरली गेली. समाजातील भ्रष्टाचार, गुन्हेगारी, शासकीय कार्यातील टाळाटाळ यामुळे न्यायालयाला ही संकल्पना वापरण्याची गरज भासते. १९८० मध्ये आग्रा सुरक्षा गृह असा खटल्यात न्यायालयाने सक्रियता दाखवली होती. आगरा येथे सुरक्षा गृहातील गैरसोय, अमानवी वागणूक याबाबतीत न्यायालयाने सक्रियता दाखवली होती. तसेच १९९३ मध्ये गंगा नदी व ताजमहालाच्या प्रदूषणाच्या बाबतीत कारखाने बंद करण्याचे निर्णयाबाबत सक्रियता दाखविली होती. तसेच मुंबई मधील पथदिवे बंद असल्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाने मुंबई महानगरपालिकेला ते लावण्याबाबत आदेश दिले होते. तसेच भ्रष्टाचाराचे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढत असल्यामुळे न्यायालयाने सक्रियता दाखवत भ्रष्टाचार कायदेशीर करा किंवा त्याची रिसीट द्या अशा पद्धतीचे ताशेरे ओढले होते. ह्या विविध बाबतीत देखील न्यायालयाने आपली सक्रियता दाखविली होती.

## क.१४ सारांश

न्यायालयीन सक्रियतेच्या संकल्पनेमध्ये काही दोष दिसून येत असले तरी बदलत्या सामाजिक, आर्थिक, राजकीय परिस्थितीमध्ये न्यायदान करीत असताना न्यायालयीन सक्रितेचे महत्त्व वाढत आहे. सामाजिक न्यायाच्या दृष्टीने बदलत्या काळानुसार न्यायदान करताना न्यायालयीन सक्रियता महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. शासनाची बेजबाबदार वृत्ती नियंत्रित करण्यामध्ये न्यायालयीन सक्रियतेची भूमिका महत्त्वपूर्ण ठरलेली आहे त्याचप्रमाणे व्यक्तीचे मूलभूत हक्क आणि स्वातंत्र्य सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने देखील न्यायालयीन सक्रियतेचे महत्त्व वाढलेले आहे. भारतीय राज्यघटनेची तसेच नागरिकांच्या मूलभूत हक्कांची अवहेलना होऊ नये यासाठी देखील न्यायालयीन सक्रियतेची भूमिका महत्त्वाची ठरलेली आहे. न्यायव्यवस्थेवरचा सामान्य जनतेचा विश्वास वाढवण्यासाठी न्यायालयीन सक्रियता अत्यंत महत्त्वाची आहे. कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ या शासनाच्या दोन महत्त्वपूर्ण अंगांनी आपली भूमिका व्यवस्थितपणे पार पाडली असती, तर न्यायालयीन सक्रियतेची आवश्यकता निर्माण झालीच नसती, परंतु दुर्दैवाने कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळाच्या निष्क्रियतेमुळे न्यायालयीन सक्रियतेला महत्व प्राप्त झालेले आहे. जनतेला समानतेची आणि न्यायाची वागणूक मिळून सामाजिक शुद्धीकरण तसेच जनताभिमुख लोकराज्य निर्माण करण्यासाठी न्यायालयीन सक्रियता आवश्यक ठरलेली आहे. भारतीय न्यायमंडळाने आतापर्यंत अनेक घटनांमध्ये न्यायालयीन क्रियाशीलता दाखवून बदलत्या परिस्थितीनुसार निर्णय दिलेले आहेत, परंतु न्यायालयाच्या सक्रियतेबरोबरच जनतेची सक्रियतादेखील अत्यंत महत्त्वाची आहे. नवसमाज निर्मितीचे स्वप्न आणि कल्याणकारी राज्याचे स्वप्न प्रत्यक्षातआणण्यासाठी न्यायालयीन सक्रियता तसेच जनतेची सक्रियता देखील महत्त्वाची आहे.

## आपली प्रगती तपासा

1) संसदीय लोकशाहीच्या कार्यवाहीतील अडथळे लिहा.

2) पंतप्रधान कार्यालयाची प्रमुख कार्य स्पष्ट करा.

3) पंतप्रधान कार्यालयातील प्रधान सचिवांची कार्य सविस्तर लिहा.

4) मुख्यमंत्री कार्यालयाची कार्य स्पष्ट करा.

5) मुख्यमंत्री कार्यालयाच्या मुख्य सचिवावर थोडक्यात निबंध लिहा.

6) राज्यपालांची भूमिका स्पष्ट करा.

7) न्यायालयीन स्वातंत्र्याविषयी लिहा.

8) न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अर्थ लिहा.

9) भारतीय न्यायव्यवस्थेतील हस्तक्षेप याविषयी लिहा.

10) न्यायालयीन सक्रियता म्हणजे काय ?

❄❄❄❄❄❄❄

# २

# स्थानिक स्वराज्य संस्थांचे कार्य

**अ) ७३ वी आणि ७४ वी घटनादुरुस्ती कायदा**

**ब) नागरी स्थानिक स्वराज्य संस्था- वर्तमान वादविवाद**

**क) ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था- वर्तमान वादविवाद**

## अ) ७३ वी आणि ७४ वी घटनादुरुस्ती कायदा (73rd & 74th Constitutional Amendment Acts) (Challenges to The Parliamentary Democracy)

१) ७३ **वी घटनादुरुस्ती कायदा (७३rd Constitutional Amendment Acts)**

**घटक रचना:**

अ.० विषय विवेचन

अ.१ उद्देश

अ.२ ७३ व्या घटनादुरुस्तीची वैशिष्ट्ये

अ.३ ७३ व्या घटनादुरुस्तीमधील घटनात्मक तरतुदी

अ.४ ७३ व्या घटनादुरुस्तीचे महत्त्व

अ.५ ७४ वी घटनादुरुस्ती कायदा (74th Constitutional Amendment Acts):-

अ.६ उद्देश

अ.७ ७४ वी घटनादुरुस्ती: वैशिष्ट्ये

अ.८ महत्त्व

### अ.० विषय विवेचन

पंचायतराज संस्थेला घटनात्मक दर्जा मिळवून देण्यासाठी पंतप्रधान व्ही. पी. सिंग रकारने प्रयत्न केले, परंतु हे सरकार अल्पजीवी ठरल्याने हे प्रयत्न यशस्वी होऊ शकले नाहीत. त्यानंतर पंतप्रधान म्हणून पी. व्ही. नरसिंहराव यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने पंचायत राज संस्थेला घटनात्मक दर्जा मिळवून देण्यासाठीचे प्रयत्न सुरू ठेवले. याचाच भाग म्हणून नरसिंहराव सरकारने १६ सप्टेंबर १९९१ रोजी पंचायत राज संस्थाबाबतचे घटनादुरुस्ती विधेयक लोकसभेत मांडले. लोकसभेने २२ डिसेंबर १९९२ रोजी या घटनादुरुस्ती विधेयकाला मंजुरी दिली, त्यानंतर २३ डिसेंबर १९९२ रोजी राज्यसभेत या विधेयकाला

मान्यता मिळाली. पंचायत राज हा विषय राज्यसूचीमध्ये समाविष्ट असल्यामुळे संसदेच्या मान्यतेबरोबरच देशातील अर्ध्यापेक्षा अधिक राज्य विधिमंडळाची मंजुरी या विधेयकाला आवश्यक होती. म्हणून हे घटनादुरुस्ती विधेयक विविध घटकराज्यांच्या विधिमंडळाच्या मंजुरीसाठी पाठवण्यात आले. देशातील घटकराज्यांपैकी १७ घटकराज्यांच्या विधीमंडळाने हे विधेयक मंजूर केले. त्यानंतर २० एप्रिल १९९३ रोजी या विधेयकाला राष्ट्रपतींची मंजुरी मिळाल्यानंतर या घटनादुरुस्ती विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाले. अशाप्रकारे हे घटनादुरुस्ती विधेयक 'पंचायत राज संविधान विशोधन अधिनियम १९९२' अर्थात '७३ वी घटनादुरुस्ती अधिनियम १९९२' म्हणून अस्तित्वात आले. २४ एप्रिल १९९३ पासून या घटनादुरुस्ती विधेयकाच्या अंमलबजावणीला भारतात सुरुवात झाली.

अशाप्रकारे ७३ व्या घटनादुरुस्तीमुळे भारतातील 'पंचायत राज' व्यवस्थेला घटनात्मक दर्जा प्राप्त झाला आणि २४ एप्रिल १९९३ पासून भारतात पंचायत राज व्यवस्थेच्या एकसमान अंमलबजावणीला घटनात्मक तरतुदीनुसार सुरुवात झाली. ७३ व्या घटनादुरुस्तीनुसार 'पंचायती' या शीर्षकाखाली 'भाग ९-A' हा नवीन भाग संविधानात समाविष्ट करण्यात आला. या भागामध्ये कलम २४३ ते कलम २४३-O अशी कलमे समाविष्ट करण्यात आली. तसेच या घटनादुरुस्तीनुसार भारतीय संविधानाला अकरावे परिशिष्ट जोडून त्यामध्ये पंचायतराज संस्थेच्या अधिकारकक्षेत येणाऱ्या २९ विषयांचा समावेश करण्यात आला.

## अ.१ उद्देश

७३ व्या घटनादुरुस्तीचे प्रमुख उद्देश पुढीलप्रमाणे आहेत;

१) पंचायत राज व्यवस्थेला घटनात्मक दर्जा प्राप्त करून देणे.

२) पंचायत राज व्यवस्थेचे आर्थिक बाबतीमधील परावलंबन दूर करणे.

३) पंचायत राज व्यवस्थेतील तत्कालीन विविधता नष्ट करून त्यामध्ये एकसूत्रता निर्माण करणे.

४) पंचायतराज व्यवस्थेमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास प्रवर्ग आणि महिलांना पुरेसे प्रतिनिधित्व देऊन त्यांना न्याय मिळवून देणे.

५) पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून मुख्य लाभार्थींपर्यंत विकास योजनांचा निधी पोहोचविणे.

६) पंचायत राज व्यवस्थेच्या तीनही स्तरांसाठी निवडणुका घेण्यासाठी राज्य स्तरावर निवडणूक आयोग स्थापन करणे.

७) ग्रामसभेला घटनात्मक दर्जा मिळवून देणे.

८) पंचायत राज व्यवस्था स्थापन करण्याचे घटनात्मक पालन राज्य सरकारवर बंधनकारक करणे.

## अ.२ ७३ व्या घटनादुरुस्तीची वैशिष्ट्ये

२४ एप्रिल १९९३ रोजी 'पंचायत राज संविधान विशोधन अधिनियम १९९२' अर्थात ७३ वी घटनादुरुस्ती मंजूर होऊन पंचायत राज व्यवस्थेसंबंधीचा जो कायदा भारतामध्ये अंमलात आला, त्या कायद्यामधील महत्त्वाच्या तरतुदींवरून ७३ व्या घटनादुरुस्तीची पुढील वैशिष्ट्ये आहेत;

१) **पंचायत राज्याची स्थापना बंधनकारक:** ७३ व्या घटनादुरुस्तीनुसार पंचायत राज्याची स्थापना करण्याचे घटनात्मक बंधन प्रत्येक राज्यावर घातलेले आहे. त्यामुळे पंचायत राज्याची स्थापना करणे, ही आता प्रत्येक घटकराज्याची घटनात्मक जबाबदारी ठरलेली आहे. यामुळे घटकराज्यांना पंचायत राज्य निर्मितीचा स्वतंत्र कायदा करण्याचा अधिकार प्राप्त झालेला आहे.

२) **पंचायत राज व्यवस्थेला घटनात्मक दर्जा:** ७३ व्या घटनादुरुस्तीमुळे भारतीय राज्यघटनेमध्ये 'पंचायती' या शीर्षकाखाली भाग ९ (A) समाविष्ट करण्यात आला. या भागामध्ये कलम २४३ (A) ते कलम २४३ (O) समाविष्ट करण्यात आले. या कलमानुसार भारतातील पंचायत राज व्यवस्थेला घटनात्मक दर्जा प्राप्त झाला, जो ७३ वी घटनादुरुस्ती होईपर्यंत या व्यवस्थेला मिळालेला नव्हता.

३) **त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्था:** ७३ व्या घटनादुरुस्तीमधील कलम २४३ (B) नुसार प्रत्येक घटकराज्यात ग्रामस्तरावर ग्रामपंचायत, मध्य स्तर अर्थात तालुका स्तरावर पंचायत समिती आणि जिल्हा स्तरावर जिल्हा परिषद अशी त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्था निर्माण करण्यात येईल, असे म्हटलेले आहे. मात्र ज्या घटकराज्याची लोकसंख्या वीस लाखांपेक्षा कमी असेल, अशा राज्यात पंचायत समिती या मध्य स्तराची स्थापना न करण्याची सवलत देण्यात आलेली आहे.

४) **ग्रामसभेला घटनात्मक दर्जा:** ७३ व्या घटनादुरुस्तीमधील कलम २४३ (A) नुसार ग्रामसभेच्या निर्मितीची तरतूद केलेली आहे. ग्रामसभेमध्ये संबंधित गावातील मतदारयादीमध्ये समाविष्ट असलेल्या सर्व प्रौढ नागरिकांचा समावेश असेल. ग्रामसभेचे अधिकार आणि कार्य निश्चित करण्याचा अधिकार राज्याच्या विधिमंडळाला दिलेला आहे. संपूर्ण गावासाठी स्थानिक सुशासनाचा, कायदेमंडळात्मक स्वरूपाचा घटक म्हणून ग्रामसभेला राज्यघटनेत स्थान देण्यात आलेले आहे. केंद्रीय स्तरावर लोकसभेला आणि राज्य स्तरावर विधानसभेला जे स्थान प्राप्त झालेले आहे, तेच स्थान गाव पातळीवर ग्रामसभेला देण्यात आलेले आहे.

५) **पंचायत राज व्यवस्थेची एकसमान संरचना:** या घटनादुरुस्तीनुसार संपूर्ण देशात पंचायत राज व्यवस्थेच्या संरचनेत एकसूत्रता निर्माण केलेली आहे. कलम २४३(C) नुसार घटकराज्यातील पंचायत राज व्यवस्थेची संरचना निश्चित करण्याचा अधिकार राज्यांना दिलेला आहे. घटकराज्याचे विधिमंडळ लोकसंख्येच्या प्रमाणात विविध स्तरावरील पंचायत संस्थांची सभासद संख्या निश्चित करील. पंचायत राज संस्थेच्या सदस्यांची निवड जनतेकडून प्रत्यक्ष प्रौढ मतदानाद्वारे केली जाईल. मात्र सरपंचाची

निवड जनतेकडून प्रत्यक्ष की अप्रत्यक्षपणे करायची, यासंबंधी त्या-त्या राज्याच्या विधिमंडळाने निर्णय घ्यावा, अशी तरतूद केलेली आहे.

६) **कार्यसूचीसाठी नवीन परिशिष्ट:** पंचायत राज संस्थांचे कार्य तसेच जबाबदारी स्पष्ट करण्यासाठी भारतीय संविधानात अकरावे परिशिष्ट नव्याने जोडण्यात आलेले आहे. या परिशिष्टामध्ये पंचायत राज संस्थेला कराव्या लागणा-या वेगवेगळ्या २९ कार्य विषयांची सूची दिलेली आहे.

७) **पंचायत राज संस्थांचा कार्यकाल:** या घटनादुरुस्तीतील कलम २४३(E) नुसार पंचायत राज संस्थांचा कार्यकाल एकसमान करून तो ५ वर्षांचा निश्चित करण्यात आलेला आहे. तसेच पाच वर्षांचा कार्यकाल पूर्ण होण्यापूर्वी या संस्थांच्या नव्याने निवडणुका घेण्याचे बंधन घालण्यात आलेले आहे. पंचायतराज संस्थेचा कार्यकाल पूर्ण होण्यापूर्वी त्या बरखास्त केल्या जाऊ शकतात, परंतु अशा संस्थांच्या बरखास्त झालेल्या तारखेपासून सहा महिन्याच्या आत नव्याने निवडणुका घेतल्या जाव्यात, असे बंधन घालण्यात आले आहे.

८) **सदस्यांची अपात्रता:** या घटनादुरुस्तीमधील कलम २४३(F) नुसार पंचायत राज संस्थेच्या सदस्यांच्या पात्रतेसंदर्भात तरतुदी केलेल्या आहेत. यानुसार पंचायतराज संस्थेच्या सदस्यांच्या अपात्रतेसंबंधीच्या तरतुदी करण्याचा अधिकार राज्याच्या विधिमंडळाला दिलेला आहे.

९) **अधिकार व कार्य:** या घटनादुरुस्तीतील कलम २४३(G)नुसार पंचायत राज संस्थांचे अधिकार व कार्य यासंबंधी तरतूद केलेली आहे. संविधानाच्या अकराव्या परिशिष्टातील २९ विषयांसह आर्थिक विकास व सामाजिक न्याय या संबंधीच्या विविध योजनांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी पंचायत राज संस्थांवर सोपविण्यात आलेली आहे.

१०) **आरक्षणाची व्यवस्था:** या घटनादुरुस्तीमधील कलम २४३(D) नुसार पंचायत राज व्यवस्थेतील संस्थांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरीकांचा मागास प्रवर्ग आणि महिला यांच्यासाठी राखीव जागा ठेवण्याची तरतूद केलेली आहे. अनुसूचित जाती आणि जमातींना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात हे आरक्षण असेल, तर इतर मागास प्रवर्गाला एकूण जागांच्या २७% आरक्षण दिले जाईल. महिलांना आरक्षण एकूण जागांच्या १/३ इतके होते, परंतु विविध राज्यांनी त्यामध्ये आता बदल केलेला आहे.

११) **वित्तीय तरतूद:** या घटनादुरुस्तीमधील २४३(H) कलमानुसार पंचायत राज संस्थांना आपल्या कार्यक्षेत्रात कर बसविणे, ते वसूल करणे तसेच त्यांचा विनियोग करण्याचा अधिकार दिलेला आहे. पंचायतराज संस्थांची कर आकारणी आणि वसुली यासंबंधीचे अधिकार निश्चित करण्याचा अधिकार राज्य विधिमंडळाला दिलेला आहे. त्याचप्रमाणे राज्य विधिमंडळ राज्याच्या संचित निधीमधून पंचायत राज संस्थांना देण्यात येणारे अनुदान निश्चित करेल.

**१२) राज्य वित्त आयोगाची निर्मिती:** ७३ व्या घटनादुरुस्तीतील कलम २४३(I)नुसार दर पाच वर्षांनी राज्याचे राज्यपाल पंचायतराज संस्थेच्या आर्थिक स्थितीचे समीक्षण करण्यासाठी एक वित्त आयोग स्थापन करतील, अशी तरतूद केलेली आहे. हा वित्त आयोग राज्य आणि पंचायत राज संस्था यांच्यातील कराच्या उत्पन्नाची विभागणी कशी करावी, पंचायत राज संस्थांना कोणते कर बसविण्याचा अधिकार द्यावा, राज्याच्या संचित निधीमधून पंचायत राज संस्थांना अनुदान द्यावयाची तत्वे ठरवणे, पंचायत राज संस्थांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्यात तसेच पंचायत राज संस्थांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्यासाठी राज्यपाल जी जबाबदारी वित्त आयोगावर सोपवेल ती पार पाडणे इ. कार्य हा वित्त आयोग करेल.

**१३) पंचायत राज संस्थांचे लेखापरीक्षण:** या घटनादुरुस्तीमधील कलम २४३ (J) नुसार पंचायत राज संस्थांचे लेखापरीक्षण करण्यासंदर्भातील तरतुदी करण्याचा अधिकार राज्य विधिमंडळास देण्यात आलेला आहे.

**१४) राज्य निवडणूक आयोगाची निर्मिती:** प्रत्येक घटकराज्यासाठी एक राज्य निवडणूक आयोग असेल, अशी तरतूद या घटनादुरुस्तीमधील कलम २४३ (K) मध्ये करण्यात आलेली आहे. पंचायत राज संस्थांच्या निवडणूका पार पाडणे, मतदार याद्या तयार करणे, निवडणुकीवर नियंत्रण व देखरेख ठेवणे, निवडणुकीचे निकाल घोषित करणे इ. निवडणूकविषयक कार्य निवडणूक आयोग करेल. निवडणूक आयोगाच्या आयुक्तांची नियुक्ती राज्यपाल करतील. पंचायत राज संस्थेच्या निवडणुकीसंदर्भातील कायदे करण्याचा अधिकार राज्य विधिमंडळाला असेल, अशी तरतूद केलेली आहे.

**१५) केंद्रशासित प्रदेशांना लागू:** या घटनादुरुस्तीच्या कलम २४३ (L) नुसार या घटनादुरुस्तीमधील सर्व तरतुदी केंद्रशासित प्रदेशांना लागू होतील, असे स्पष्ट केलेले आहे. म्हणजेच घटकराज्यांबरोबरच भारतातील सर्व केंद्रशासित प्रदेशांनाही ही घटनादुरुस्ती लागू करण्यात आलेली आहे.

**१६) विशिष्ट क्षेत्रांना ही घटनादुरुस्ती लागू नाही:** या घटनादुरुस्तीनुसार केलेल्या तरतुदी कलम २४३ (M) नुसार भारतातील कोणत्या विभागांना लागू होणार नाहीत, हे स्पष्ट केलेले आहे. यानुसार नागालँड, मेघालय, मिझोरम, मनिपुर या घटकराज्यातील पहाडी प्रदेश तसेच भारतीय संविधानाच्या २४४ व्या कलमात निर्देशित केलेले अनुसूचित जनजातिविषयक प्रदेश तसेच पश्चिम बंगालचा दार्जिलिंग जिल्हा इ. भागात या घटनादुरुस्तीमधील तरतुदी लागू केल्या जाणार नाहीत.

## अ.३ ७३ व्या घटनादुरुस्तीमधील घटनात्मक तरतुदी:-

| **कलम** | **घटनात्मक तरतूद** |
|---|---|
| कलम २४३ | व्याख्या |
| कलम २४३(A) | ग्रामसभा |
| कलम २४३(B) | पंचायती गठीत करणे |

| कलम | घटनात्मक तरतूद |
|---|---|
| कलम २४३(C) | पंचायतींची रचना |
| कलम २४३(D) | जागांचे आरक्षण |
| कलम २४३(E) | पंचायतींचा कार्यकाल |
| कलम २४३(F) | सदस्यत्वासाठी पात्रता |
| कलम २४३(G) | पंचायतींचे अधिकार, जबाबदाऱ्या आणि कार्य |
| कलम २४३(H) | पंचायतींचा कर लावण्याचा अधिकार आणि पंचायतींचे निधी |
| कलम २४३(I) | वित्त आयोगाची तरतूद |
| कलम २४३(J) | पंचायतींचे लेखापरीक्षण |
| कलम २४३(K) | पंचायतीच्या निवडणुका |
| कलम २४३(L) | केंद्रशासित प्रदेशांना लागू करणे |
| कलम २४३(M) | विशिष्ट क्षेत्रांना हा भाग लागू नसणे |
| कलम २४३(N) | विद्यमान कायदे व पंचायती अस्तित्वात राहणे |
| कलम २४३(O) | निवडणुकीसंबंधीच्या बाबींमध्ये न्यायालयाने हस्तक्षेप करण्यास विरोध |

## अ.४ ७३ व्या घटनादुरुस्तीचे महत्त्व

पंचायत राज संस्थांचे स्वरूप पूर्णपणे बदलून टाकण्यामध्ये ७३ व्या घटनादुरुस्तीची भूमिका महत्त्वपूर्ण ठरलेली आहे. कारण या घटनादुरुस्तीनुसार पंचायत राज संस्थांना घटनात्मक दर्जा प्राप्त झाल्यामुळे या संस्थांची प्रतिष्ठा वाढलेली आहे. सत्तेचे विकेंद्रीकरण होऊन सत्ता समाजातील तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी ही घटनादुरुस्ती महत्त्वपूर्ण ठरलेली आहे. तसेच अनुसूचित जाती, जमाती, मागास प्रवर्ग आणि महिला यांनादेखील राज्यकारभारात सक्रियपणे सहभागी करून घेण्यात ही घटनादुरुस्ती बऱ्याच अंशी यशस्वी ठरलेली आहे. कारण या घटकांना आरक्षण निर्माण करून त्यांचे प्रतिनिधित्व पंचायत राज संस्थेमध्ये उभे करण्याचे काम या घटनादुरुस्तीने केलेले आहे. राज्य निवडणूक आयोग, राज्य वित्त आयोग, पंचायत राज संस्थेमधील राखीव जागा, पंचायत राज संस्थेचे अधिकार व कार्य, ग्रामसभा व तिचे अधिकार, पंचायतींच्या हिशोबाचे लेखापरीक्षण इ. संबंधी या घटनादुरुस्तीत करण्यात आलेल्या तरतुदी अतिशय महत्त्वाच्या ठरलेल्या आहेत. पंचायत राज संस्थेला घटनात्मक दर्जा बहाल करतांना तसेच तिची प्रतिष्ठा वाढवताना राज्याच्या अधिकारावर कोणत्याही मर्यादा येणार नाहीत, याची दक्षता या घटनादुरुस्तीमध्ये घेण्यात आलेली आहे. पंचायत राज संस्थेच्या संदर्भात कायदे करण्याचा अधिकार घटकराज्याच्या विधिमंडळाला दिलेला आहे. थोडक्यात राज्य सरकार आणि पंचायत राज संस्था यांच्यात योग्य समतोल साधण्याचे कार्य ७३ व्या घटनादुरुस्तीने केलेले आहे. ७३ व्या घटनादुरुस्तीमुळे पंचायत राज संस्थेला घटनात्मक दर्जा प्राप्त करून दिलेला असला तरीदेखील प्रत्यक्षात या घटनादुरुस्तीमुळे

निर्माण करण्यात आलेल्या तरतुदींचे पालन किती प्रमाणात आणि कोणत्या प्रकारे होते, यावर या घटनादुरुस्तीचे यशापयश अवलंबून आहे.

-----------------------------------------------------------------------------------------------

**सारांश**

७३ व्या घटनादुरुस्तीने पंचायत राज व्यवस्थेला घटनात्मक दर्जा तसेच विशेष प्रतिष्ठादेखील मिळवून दिलेली आहे. पंचायत राज व्यवस्थेच्या निवडणुका वेळेवर घेण्याचे घटनात्मक बंधन राज्य सरकारवर टाकण्यात आल्यामुळे जनतेचा राजकीय सहभाग स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे. अनुसूचित जाती, जमाती, मागास प्रवर्ग आणि महिला यांना दिलेल्या राखीव जागांमुळे सत्तेचे विकेंद्रीकरण खऱ्याखुऱ्या अर्थाने झालेले दिसून येते. वित्त आयोगाच्या तरतुदीमुळे पंचायत राज संस्थेची आर्थिक स्थिती सुधारण्यास गती मिळालेली आहे. तसेच राज्य निवडणूक आयोगाच्या तरतुदीमुळे पंचायत राज संस्थेच्या निवडणुका निकोप, स्वच्छ,निपक्षपाती आणि खुल्या वातावरणात घेतल्या जात आहेत. या घटनादुरुस्तीमुळे सत्तेचे विकेंद्रीकरण अधिकाधिक प्रमाणात झाल्यामुळे लोकशाहीच्या सक्षमीकरणात महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. थोडक्यात ७३ व्या घटनादुरुस्तीनुसार पंचायत राज व्यवस्थेत करण्यात आलेले बदल हे लोकशाहीला पूरक आणि तेवढेच पोषकदेखील ठरलेले आहेत.

## अ.५ ७४ वी घटनादुरुस्ती कायदा (७४th Constitutional Amendment Acts)

पंचायत राज संस्थांना संविधानिक दर्जा मिळावा, ही मागणी जोर धरत असतानाच नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनाही असाच संविधानात्मक दर्जा देण्यात यावा, असा विचार पुढे येत होता. या दृष्टिकोनातूनच १९८९ मध्ये पंतप्रधान राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा देण्याच्या उद्देशाने ६५ वे घटनादुरुस्ती विधेयक संसदेमध्ये मांडले, परंतु ते राज्यसभेने फेटाळल्यामुळे मंजूर होऊ शकले नाही. पी. व्ही. नरसिंहराव पंतप्रधान असताना नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेला घटनात्मक दर्जा देणारे ७४ वे घटनादुरुस्ती विधेयक संसदेत मांडण्यात आले. या विधेयकाला २२ डिसेंबर १९९२ रोजी लोकसभेने, तर २३ डिसेंबर १९९२ रोजी राज्यसभेने मंजुरी दिली. संसदेच्या मंजुरीनंतर या घटनादुरुस्ती विधेयकाला अर्ध्यापेक्षा अधिक घटकराज्यांच्या विधानसभांची मान्यता मिळाली. तसेच २० एप्रिल १९९३ रोजी राष्ट्रपतींची या विधेयकावर स्वाक्षरी झाल्यामुळे या विधेयकाला घटनात्मक दर्जा मिळाला आणि १ जून १९९३ पासून ७४ वे घटनादुरुस्ती विधेयक अंमलात आले. अशाप्रकारे 'नगरपालिका संविधान विशोधन अधिनियम १९९२' अर्थात '७४ वी घटनादुरुस्ती अधिनियम १९९२' म्हणून अस्तित्वात आले.

७४ व्या घटनादुरुस्तीनुसार 'नगरपालिका' या शीर्षकाखाली भारतीय संविधानात 'भाग ९-अ' समाविष्ट करण्यात आला. यामध्ये कलम २४३(P) ते कलम २४३(ZG) समाविष्ट करून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संदर्भातील तरतुदी करण्यात आल्या, तसेच भारतीय

संविधानात १८ विषय असणारे बारावे परिशिष्टही जोडण्यात आले. अशाप्रकारे ७४ व्या घटनादुरुस्तीमुळे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेला घटनात्मक दर्जा प्राप्त झाला.

## अ.६ उद्देश

७४ व्या घटनादुरुस्तीचे प्रमुख उद्देश पुढीलप्रमाणे आहेत;

१) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा प्राप्त करून देणे.

२) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची कार्यसूची निश्चित करणे.

३) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकींमधील अनियमितता टाळणे.

४) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना आर्थिकदृष्ट्या सक्षम तसेच स्वावलंबी बनवणे.

५) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यात एकसूत्रता तसेच सुसूत्रता निर्माण करणे.

६) शासकीय विकास योजनांचा लाभ नागरी भागातील प्रत्यक्ष लाभार्थींपर्यंत पोहोचविणे.

७) अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्ग व महिलांना आरक्षण देऊन नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेमधील त्यांचा राजकीय सहभाग वाढवणे.

८) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेतील राजकीय व प्रशासकीय प्रमुखांमध्ये परस्पर सहकार्य व सामंजस्य निर्माण करणे.

## अ.७ ७४ वी घटनादुरुस्ती: वैशिष्ट्ये

**१) घटनात्मक दर्जा:** ७४ व्या घटनादुरुस्तीमुळे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा प्राप्त झाला. या घटनादुरुस्तीमुळे भारतीय संविधानात 'भाग ९-अ' मध्ये कलम २४३(P) ते २४३(ZG) समाविष्ट करण्यात आले.

**२) त्रिस्तरीय नागरी संस्था:** ७४ व्या घटनादुरुस्तीमध्ये नागरी क्षेत्रात तीन प्रकारच्या नागरी संस्थांची स्थापना करण्याची तरतूद केलेली आहे. यामध्ये मोठ्या शहरांसाठी महानगरपालिका, लहान शहरांसाठी नगरपरिषद आणि ग्रामीण क्षेत्रामधून नागरी क्षेत्रांमध्ये संक्रमण होत असलेल्या क्षेत्रासाठी नगरपंचायत स्थापन करण्यासंदर्भात तरतुदी केलेल्या आहेत.

**३) कार्यसूचीसाठी नवीन परिशिष्ट:** ७४ व्या घटनादुरुस्तीनुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे कार्य आणि जबाबदाऱ्या स्पष्ट करण्यासाठी भारतीय संविधानात बारावे परिशिष्ट जोडण्यात आले या परिशिष्टामध्ये नागरी स्थानिक संस्थांना करावयाच्या विविध १८ कार्यांची विषयसूची दिलेली आहे.

**४) आरक्षणाची तरतूद:** ७४ व्या घटनादुरुस्तीनुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये अनुसूचित जाती व जमातींना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागा तसेच इतर मागास प्रवर्गाला २७% राखीव जागांची तरतूद केलेली आहे. तसेच

महिलांना १/३ जागा आरक्षित केल्या होत्या, परंतु त्यामध्ये आता वाढ करून हे आरक्षण ५०% करण्यात आलेले आहे.

५) **एकसमान कार्यकाल:** नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा कार्यकाल या घटनादुरुस्तीनुसार सर्वसाधारणपणे पाच वर्षांचा करण्यात आलेला आहे, परंतु हा कार्यकाल पूर्ण होण्यापूर्वी राज्य सरकार ठोस कारणास्तव नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे विसर्जनही करू शकते. परंतु विसर्जन केल्यास पुढील सहा महिन्यांच्या आत नव्याने निवडणुका घेण्याचे घटनात्मक बंधन घातलेले आहे.

६) **वित्त आयोगाची तरतूद:** नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची आर्थिक स्थिती सुधारणे, त्यांच्यासाठी अनुदानाची तत्वे ठरवणे, तसेच कर लावण्यासंदर्भात सूचना करण्यासाठी वित्त आयोगाची निर्मिती करण्यात आलेली आहे. वित्त आयोग नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या आर्थिक स्थितीचे पुनर्विलोकन करून उपाययोजना तसेच शिफारशी करू शकतो.

७) **नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकार व जबाबदाऱ्या:** ७४ व्या घटनादुरुस्तीनुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे अधिकार, कार्य आणि जबाबदाऱ्या निश्चित करण्याचा अधिकार राज्य विधिमंडळाला दिलेला आहे. सामाजिक न्याय व आर्थिक विकासासाठी योजना तयार करणे, बाराव्या परिशिष्टातील कार्यसूचीसंदर्भातील योजनांची अंमलबजावणी करणे इ. संदर्भातील जबाबदाऱ्या कायदा करून राज्य विधिमंडळ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेकडे देईल.

८) **सदस्यांची अपात्रता:** नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक लढविण्यास कोणती व्यक्ती पात्र आहे किंवा पात्र नाही, हे ठरविण्याची जबाबदारी या घटनादुरुस्तीनुसार राज्य विधिमंडळावर सोपविण्यात आलेली आहे. राज्य विधिमंडळाला त्यासंदर्भात कायदा करण्याचा अधिकार आहे.

९) **वित्तीय व्यवस्था:** या घटनादुरुस्तीनुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संदर्भातील कर आकारणी व वसुली यासंबंधीचे अधिकार निश्चित करण्याची जबाबदारी राज्य विधिमंडळावर सोपवलेली आहे. तसेच राज्य सरकार नागरी स्थानिक संस्थांना राज्याच्या संचित निधीमधून देण्यात येणाऱ्या अनुदानासंबंधीचे धोरण ठरविल, अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

१०) **राज्य निवडणूक आयोगाची निर्मिती:** नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका नि:पक्षपाती, स्वच्छ व खुल्या वातावरणात पार पाडण्याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपवलेली आहे. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसंबंधी घटकराज्याचे विधिमंडळ कायद्याद्वारे तरतुदी करू शकेल.

११) **लेखापरीक्षण:** या घटनादुरुस्तीनुसार घटकराज्याच्या कायदेमंडळाला नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेकडून लेखे ठेवण्यासंबंधी आणि अशा लेखांचे लेखापरीक्षण करण्यासंबंधी तरतूद करण्याचा अधिकार दिलेला आहे.

१२) **महानगर नियोजन समितीची तरतूद:** या घटनादुरुस्तीनुसार प्रत्येक महानगर क्षेत्राची विकास योजना तयार करण्यासाठी 'महानगर नियोजन समिती' स्थापन करण्याची तरतूद केलेली आहे. महानगर नियोजन समितीबाबत आवश्यक त्या तरतुदी करण्याचा अधिकार राज्याच्या विधिमंडळाला दिलेला आहे.

१३) **जिल्हा नियोजन समितीची स्थापना:** या घटनादुरुस्तीनुसार जिल्हा पातळीवर त्या जिल्ह्यातील पंचायती आणि नगरपालिका यांनी तयार केलेल्या योजना एकत्रित करण्यासाठी आणि संपूर्ण जिल्ह्याची एकत्र प्रारूप विकास योजना तयार करण्यासाठी 'जिल्हा नियोजन समिती' स्थापन करण्याची तरतूद केलेली आहे. जिल्हा नियोजन समिती स्थापन करण्याबाबतचे अधिकार राज्य विधिमंडळाला दिलेले आहेत.

१४) **केंद्रशासित प्रदेशासाठी तरतूद:** या घटनादुरुस्तीमधील तरतुदी घटकराज्याप्रमाणेच केंद्रशासित प्रदेशांनाही लागू असतील. विधिमंडळ असणाऱ्या केंद्रशासित प्रदेशासाठी विधिमंडळ कायदा करेल, तर विधिमंडळ नसणाऱ्या केंद्रशासित प्रदेशासाठी राष्ट्रपतींच्या निर्देशानुसार संसद कायदा करेल, अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

१५) **विशिष्ट क्षेत्रांना ही घटनादुरुस्ती लागू नाही:** भारतीय संविधानाच्या कलम २४४ मध्ये स्पष्ट केलेल्या अनुसूचित क्षेत्रांना ही घटनादुरुस्ती लागू होणार नाही. यामध्ये पश्चिम बंगालमधील दार्जिलिंग जिल्ह्यातील पहाडी क्षेत्राचा समावेश होतो.

१६) **प्रभाग समित्यांची तरतूद:** या घटनादुरुस्तीनुसार तीन लाख किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या नगरपालिका क्षेत्रात एक किंवा अधिक प्रभागांसाठी प्रभाग समित्या स्थापन करण्याची तरतूद केलेली आहे. प्रभाग समितीची रचना, त्यांची कार्यपद्धती याविषयी निर्णय घेण्याचा अधिकार राज्य विधिमंडळाला दिलेला आहे.

## अ.८ महत्त्व

७४ व्या घटनादुरुस्तीने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा प्राप्त करून दिला. त्यामुळे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना भारतीय संविधानाचे संरक्षण प्राप्त झालेले आहे. स्थानिक स्वराज्य संस्था हा विषय राज्यसूचीत समाविष्ट करण्यात आलेला असला तरीदेखील राज्य शासन नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारात आपल्या मर्जीप्रमाणे हस्तक्षेप करू शकत नाही, कारण ७४ व्या घटनादुरुस्तीतील तरतुदी राज्य सरकारवर बंधनकारक करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे या घटनादुरुस्तीतील तरतुदींचे पालन करण्याचे घटनात्मक बंधन राज्य शासनावर टाकण्यात आलेले आहे.

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपवलेली आहे. त्यामुळे या घटनादुरुस्तीनुसार राज्य शासनाला राज्य निवडणूक आयोगाच्या मदतीने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका नियमित तसेच वेळेवर घेणे बंधनकारक आहे. या घटनादुरुस्तीमुळे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेतील राज्यशासनाच्या वाढत्या हस्तक्षेपाला आळा बसलेला आहे. थोडक्यात ७४ व्या घटनादुरुस्तीमुळे राज्यशासनाच्या मनमानी हस्तक्षेपाला आळा घालण्यात येऊन नागरी

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका वेळेवर होत असल्यामुळे जनतेचा राजकीय सहभाग वाढू लागलेला आहे.

७४ व्या घटनादुरुस्तीमुळे वित्त आयोगाची स्थापना करण्यात आल्यामुळे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आर्थिक स्थितीचे पुनर्विलोकन होऊ लागलेले आहे. तसेच या नागरी संस्थांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी किंवा त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम व स्वावलंबी बनवण्यासाठी वित्त आयोग विविध शिफारशी तसेच उपाययोजना करीत असतो. त्याचप्रमाणे या घटनादुरुस्तीमुळे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास प्रवर्ग आणि महिला या घटकांना आरक्षण देण्यात आलेले आहे. त्यामुळे या सर्व घटकांचा राजकीय सहभाग वाढू लागलेला आहे. या घटनादुरुस्तीनुसार राज्य सरकारला 'जिल्हा नियोजन समिती' आणि 'महानगर नियोजन समिती' अशा दोन समित्या स्थापन करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. या समित्यांनी संबंधित क्षेत्राच्या विकासासाठी योजनांचा आराखडा तयार करून तो राज्य शासनाकडे पाठविणे अपेक्षित असते. या घटनादुरुस्तीनुसार भारतीय संविधानात १२ वे परिशिष्ट समाविष्ट करण्यात येऊन यामध्ये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिकार, कार्य व जबाबदाऱ्या यासंदर्भातील १८ विषयांचा समावेश करण्यात आलेला आहे.

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना बळकटी प्राप्त करून देण्यासाठी ७४ व्या घटनादुरुस्तीची भूमिका महत्त्वाची ठरलेली असली तरीदेखील या घटनादुरुस्तीमध्ये काही उणीवा किंवा दोष देखील आढळून येतात. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे एकांगी स्वरूप, या संस्थेच्या निवडणुकीत होणारे गटबाजीचे राजकारण, आरक्षण मिळूनही स्त्रियांची राजकीय सहभागामधील राजकीय उदासीनता, लेखापरीक्षणातील उणिवा तसेच वित्त आयोगाची निष्प्रभता इ. उणिवा दिसून येतात.

## अ.९ सारांश

७४ वी घटनादुरुस्ती ही नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संदर्भात मैलाचा दगड ठरलेली आहे, कारण या घटनादुरुस्तीनुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा प्राप्त झाला. या घटनादुरुस्तीनुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे संचलन करण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आल्यामुळे तसेच या संस्थांच्या निवडणुका वेळेवर आणि मुक्त वातावरणात घेण्यात येत असल्यामुळे नागरिकांचा राजकीय सहभाग वाढू लागलेला आहे. याशिवाय विविध घटकांना देण्यात आलेल्या आरक्षणामुळे राजकीय प्रवाहाबाहेरील घटकांचा राजकीय सहभाग स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणात वाढू लागलेला आहे. थोडक्यात या घटनादुरुस्तीमुळे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना भारतीय संविधानाचे संरक्षण प्राप्त होऊन नागरी भागाच्या विकासामध्ये या संस्था महत्त्वाची भूमिका पार पाडत आहेत.

❄❄❄❄❄❄❄

# ब) नागरी स्थानिक स्वराज्य संस्था-वर्तमान वादविवाद (Urban Local Self Government- Current Debates)

**घटक रचना:**

ब.० उद्दिष्टे

ब.१ उद्देश

ब.२ संसाधनांची उपलब्धता

ब.३ स्वायत्तता

ब.४ भ्रष्टाचार आणि पारदर्शकतेचा अभाव

ब.५ राजकीय हस्तक्षेप

ब.६ नागरिकांची राजकीय जागरूकता आणि सहभाग

ब.७ लोकप्रतिनिधींचे अधिकार

ब.८ पायाभूत सुविधा

ब.९ वित्तीय सक्षमता

ब.१० सारांश

## ब.१ उद्देश

नागरी स्थानिक स्वराज्य संस्था या शहरी क्षेत्रातील प्रशासनाचा एक महत्त्वपूर्ण भाग आहेत. कारण शहरी क्षेत्रातील प्रशासनाचे व्यवस्थापन करण्याचे कार्य या संस्था करीत असतात. कुणावरील स्थानिक स्वराज्य संस्थांचा उद्देश नागरी भागातील नागरिकांना उत्तम सार्वजनिक सेवा, पायाभूत सुविधांचा विकास, सार्वजनिक सेवांची गुणवत्ता वाढवणे आणि आवश्यक सुविधांचा पुरवठा करून नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा करणे हा असतो. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत आणि इतर संस्थांचा समावेश होतो. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजासंदर्भात सध्या काही वादविवाद सुरू आहेत, ते पुढील प्रमाणे;

## ब.२ संसाधनांची उपलब्धता

शहरी भागातील नागरिकांना सेवा पुरविण्यासाठी आणि तेथील पायाभूत क्षेत्राचा विकास करण्यासाठी योग्य निधी किंवा संसाधनांची आवश्यकता असते. परंतु नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना कार्यासाठी आवश्यक असणारा निधी कमी प्रमाणात दिला जातो. केंद्र आणि राज्य सरकारकडून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना निधी आणि कर संकलनावर मर्यादा टाकल्यामुळे शहरी भागाचा विकास आणि पायाभूत सुविधा पुरविण्यात अडथळे निर्माण होतात. यामुळे या संदर्भात सध्या वादविवाद निर्माण झालेला आहे. पर्यंत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना स्वतःचे कर संकलन व वितरण याबाबतीत अधिक अधिकार

द्यावेत त्याचप्रमाणे पुरेसा निधी केंद्र आणि राज्य सरकारने उपलब्ध करून द्यावा अशी मागणी वाढत आहे. त्यामुळे शहरी भागातील विकास प्रकल्प गतीने राबविणे या संस्थांना शक्य होऊन पायाभूत क्षेत्राचा विकास होण्यास मदत होईल.

## ब.३ स्वायत्तता

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक स्वायत्तता देण्याच्या संदर्भात सध्या वादविवाद आहेत. केंद्र आणि राज्य सरकार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्थानिक कारभारात हस्तक्षेप करीत असल्यामुळे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना कार्यकर्त्यांना अनेक अडचणी येतात. थोडक्यात नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना आपल्या कार्यक्षमतेला चालना देण्यासाठी आवश्यक असणारी स्वायत्तता केंद्र आणि राज्य सरकारकडून दिली जात नाही. दोन्ही पातळीवरील सरकारकडून नागरी स्थानिक प्रशासनात होणाऱ्या हस्तक्षेपामुळे नागरी स्थानिक प्रशासन प्रभावीपणे कार्य करू शकत नाही. त्यामुळे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिकाधिक स्वायत्तता दिली जावी अशी मागणी केली जात आहे. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना स्वायत्तता दिल्यास त्यांची कार्यक्षमता वाढून स्थानिक प्रशासन स्वतंत्रपणे निर्णय घेण्यासाठी सक्षम बनेल. परंतु नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना स्वायत्तता देणे म्हणजे सरकारचे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेवरील नियंत्रण कमी होण्याचा धोका वाढतो. यातून लागलीस स्थानिक प्रशासनात अराजकता वाढण्याचीही भीती आहे.

## ब.४ भ्रष्टाचार आणि पारदर्शकतेचा अभाव

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये वाढता भ्रष्टाचार आणि पारदर्शकतेचा अभाव हा एक वाद-विवादात्मक मुद्दा बनलेला आहे. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेतील सार्वजनिक निधीचा गैरवापर होणे, भ्रष्टाचार, सार्वजनिक निधीचा अपव्यय होणे आणि योजनांची अंमलबजावणी अयोग्य पद्धतीने होणे इ. मूळे या संस्थांच्या प्रशासनावर प्रश्नचिन्ह उभे राहिलेले आहे. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेतील अधिकारी आणि लोकप्रतिनिधी आपल्या सत्तेचा दुरुपयोग करतात. भ्रष्टाचारामुळे नागरी भागातील विकास प्रक्रिया मंदावते तसेच नागरिकांना दिल्या जाणाऱ्या पायाभूत सेवा आणि सुविधांचा दर्जाही घटतो. भ्रष्टाचारावर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच या संस्थेतील कारभार पारदर्शक करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कामकाजातील पारदर्शकता वाढवण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करणे आणि जबाबदारी सुनिश्चित करणे आवश्यक आहे.

## ब.५ राजकीय हस्तक्षेप

राजकीय पक्ष आणि नेते राजकीय फायद्यासाठी किंवा स्वार्थासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा वापर करतात. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तसेच प्रशासनामध्ये राजकीय हस्तक्षेत होत असल्यामुळे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे विकास कार्य मंदावते. यामुळे नागरिक स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संदर्भात वादविवाद निर्माण झालेले आहेत. म्हणून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना राजकीय हस्तक्षेप विरहित स्वतंत्रपणे काम करण्याची संधी दिली जावी. शुद्ध आणि निष्पक्ष वातावरणात निवडणुकीची

प्रक्रिया पार पाडण्यात यावी आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेतील राजकीय हस्तक्षेप टाळावा, अशी मागणी वाढत आहे.

## ब.६ नागरिकांची राजकीय जागरूकता आणि सहभाग

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजामध्ये नागरिकांमधील जागरूकतेच्या अभावी नागरिकांचा कमी असणारा सहभाग, स्वतःच्या अधिकाराबद्दल आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रशासकीय कार्यप्रणाली बद्दल असणारी अनभिज्ञता याचा परिणाम नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यक्षमतेवर होतो. यामुळे प्रशासनातील अनेक चुका किंवा तक्रारी सुधारल्या जात नाहीत. नागरिकांच्या समस्या आणि प्रश्नांना स्थानिक निर्णय प्रक्रियेत समाविष्ट करणे आवश्यक असते परंतु तसे होत नसल्यामुळे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेतील नागरिकांचा सहभाग कमी होत आहे. नागरिकांना अधिक जागरूक करून त्यांना नागरिक स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कारभारात सहभागी करून घेतल्यास स्थानिक प्रशासन अधिक प्रभावशाली बनवता येईल. परंतु दुसरीकडे नागरिकांचा सहभाग जास्त वाढल्यास निर्णय प्रक्रियेस विलंब होऊ शकतो आणि त्याचा प्रशासनावर नकारात्मक प्रभा पडू शकतो, असे वादविवाद यासंदर्भात निर्माण झालेले आहेत.

## ब.७ लोकप्रतिनिधींचे अधिकार

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेतील लोकप्रतिनिधींना अधिक अधिकार आणि स्वायत्तता देण्याच्या संदर्भात देखील सध्या वादविवाद सुरू आहेत. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेतील लोकप्रतिनिधींना अधिक अधिकार देण्याची मागणी होत आहे. कारण केंद्र आणि राज्य सरकार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कारभारात हस्तक्षेप करीत असल्यामुळे स्थानिक प्रशासनाचे कार्य ठप्प होते म्हणून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेतील लोकप्रतिनिधींना अधिक अधिकार देण्याची मागणी जोर धरत आहे.

## ब.८ पायाभूत सुविधा

शहरी भागामध्ये पाणीपुरवठा, गटारी व्यवस्था, रस्ते, कचरा व्यवस्थापन, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, दिवाबत्ती इ. प्रकारच्या पायाभूत सुविधा महत्त्वपूर्ण असतात. परंतु अनेक शहरांमध्ये या पायाभूत सुविधा सुधारणा घडवून आणण्यासाठी योग्य योजना किंवा संसाधने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे उपलब्ध नाहीत. कारण नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेकडे निधीची असणारी कमतरता किंवा केंद्र व राज्य सरकारकडून होणारा कमी वित्तपुरवठा यामुळे सदर पायाभूत सुविधांचे कार्यान्वयन करण्यासाठी अडचणी निर्माण होतात. याशिवाय नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे पायाभूत सुविधांची अंमलबजावणी करण्यासाठी यंत्रणांची कमतरता असते. म्हणून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेकडून पायाभूत सुविधांची योग्य अंमलबजावणी करण्यासंदर्भात वादविवाद सुरू आहेत.

## ब.९ वित्तीय सक्षमता

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मिळणारा निधी किंवा वित्तीय सक्षमता या संदर्भात वर्तमान स्थितीत वादविवाद सुरू आहेत. कारण शहरातील पायाभूत सुविधांच्या सुधारण्यासाठी निधी मिळविणे हे एक मोठे आव्हान नागरिक स्थानिक स्वराज्य संस्था समोर उभे आहे. निधी अभावी पायाभूत सुविधेच्या संदर्भातील विकास कामे वेळेत पूर्ण होऊ शकत नाहीत. त्यामुळे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना केंद्र आणि राज्य सरकार यांनी अधिक वित्तीय स्वायत्तता देऊन आर्थिक बाबतीत सक्षम केले पाहिजे, अशा प्रकारची मागणी सध्या वाढत आहे.

## ब.१० सारांश

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संदर्भात वर्तमान स्थितीत स्वायत्तता, वित्तीय सक्षमता, भ्रष्टाचार मुक्ती, प्रशासनातील पारदर्शकता, नागरिकांचा सक्रिय सहभाग, जास्त अधिकार, संसाधनांची आवश्यकता, केंद्र व राज्य सरकारचा राजकीय हस्तक्षेप, वाढत्या शहरीकरणामुळे निर्माण होणाऱ्या समस्या इ. वाद विवादांचा समावेश आहे. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये सुधारणा करून या संस्थांना कार्यक्षम करण्यासाठी वरील वाद विवादांवर सर्वमान्य उपाय योजनेची आवश्यकता आहे. असे झाले तरच नागरिक क्षेत्राचा विकास अधिक प्रभावीपणे होऊ शकेल आणि तेथील नागरिकांना उत्तम पायाभूत सुविधांचा आणि सेवांचा लाभ मिळवता येईल.

❊❊❊❊❊❊❊

# क) ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था- वर्तमान वादविवाद (Rural Local Self Government- Current Debate)

**घटक रचना:**

क.० उद्देश

क.१ वित्तीय संसाधने

क.२ स्थानिक स्वायत्तता

क.३ महिलांचे प्रतिनिधित्व

क.४ राजकीय हस्तक्षेप

क.५ भ्रष्टाचार आणि पारदर्शकतेचा अभाव

क.६ विकास कार्यातील विलंब

क.७ कायदा आणि सुव्यवस्था

क.८ ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांची संरचना

क.९ सारांश

## क.० उद्देश

ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजेच पंचायत राज संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील प्रशासन सांभाळले जाते. ग्रामीण भागाचा विकास करणे, नागरिकांना मूलभूत सुविधा पुरवणे, आणि स्थानिक पातळीवर केंद्र व राज्य शासनाच्या धोरणांची अंमलबजावणी करणे या उद्देशाने ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था कार्यरत आहेत. थोडक्यात ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था या गाव, तालुका व जिल्ह्याच्या प्रशासनाचे कार्य परिणामकारक करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. परंतु असे असले तरी देखील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संदर्भात वर्तमान काळात काही वादविवाद चर्चेत आहेत. त्यामुळे ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना सध्या सुरू असलेल्या खालील वादविवाद किंवा समस्यांचा सामना करावा लागत आहे;

## क.१ वित्तीय संसाधने

ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये कार्य करण्यासाठी आवश्यक निधी आणि संसाधने उपलब्ध होत नाहीत. त्याचप्रमाणे राज्य सरकार किंवा केंद्र सरकारकडून वेळेवर निधी दिला जात नसल्यामुळे स्थानिक पातळीवर विविध योजनांची अंमलबजावणी करणे कठीण होते. त्यामुळे ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिकाधिक वित्तीय अधिकार आणि संसाधनांचा पुरवठा करण्यात यावा, निधीची स्वायत्तता देण्यात यावी, कर संकलनाचे अधिकार देण्यात यावेत अशी मागणी सध्या केली जात आहे. यामुळे स्थानिक

विकास कामांना गती मिळेल आणि स्थानिक स्वराज्य संस्था अधिक कार्यक्षमपणे काम करू शकतील ही त्या मागची भूमिका आहे.

## क.२ स्थानिक स्वायत्तता

ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना केंद्र आणि राज्य सरकारच्या हस्तक्षेपामुळे खूप कमी स्वायत्तता मिळते. त्याचप्रमाणे स्थानिक स्तरावर करण्यात येणाऱ्या निवडी आणि घेण्यात येणारे निर्णय अनेक वेळा केंद्र आणि राज्य सरकारच्या होणाऱ्या हस्तक्षेपामुळे अडथळ्यात अडकतात. त्यामुळे स्थानिक स्तरावर निर्णय घेण्यास अडथळे येतात. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था अनेकदा राज्य सरकारच्या ताब्यात असतात, त्यामुळे निर्णय घेणे किंवा निर्णय व योजनांची अंमलबजावणी करणे राज्य सरकारच्या हस्तक्षेपामुळे कठीण होते. पर्यायाने ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांची कार्यक्षमता कमी होते. यामुळे ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना स्वायत्तता देण्याची मागणी वाढत आहे. ग्रामीण क्षेत्रातील निर्णय घेण्याची मुभा आणि स्वतंत्रता असावी. ज्यामुळे स्थानिक विकासाला गती येऊन ग्रामीण भागातील जीवनमान सुधारण्यास मदत होईल, अशी मागणी होत आहे.

## क.३ महिलांचे प्रतिनिधित्व

भारतीय संविधान आणि पंचायत राज कायद्यानुसार सध्या ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये महिलांना ५०% आरक्षण देण्यात आलेले आहे. परंतु असे असले तरी अनेक ठिकाणी महिलांचे प्रतिनिधित्व फक्त नामदारी किंवा सांकेतिक स्वरूपात दिसून येते. महिलांच्या नावावर पुरुष सदस्य सत्तेचे अधिकार वापरतात, त्यामुळे महिलांच्या सक्षमीकरणात अडथळे येतात. त्यामुळे ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये महिलांना नुसते सांकेतिक प्रतिनिधित्व न देता त्यांना स्वतंत्रपणे निर्णय घेण्याची आणि ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेत प्रभावीपणे भूमिका निभावण्याची संधी दिली जावी, अशी मागणी केली जात आहे. यासाठी महिलांना आवश्यक ते प्रशिक्षण आणि संसाधने पुरवण्याचा देखील आग्रह धरण्यात येत आहे. याशिवाय महिलांना खरे अधिकार आणि स्वायत्तता दिल्यास ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेत प्रतिनिधित्व करणाऱ्या महिलांची कार्य कुशलता वाढून त्यांचे खऱ्या अर्थाने सशक्तिकरण होऊ शकेल.

## क.४ राजकीय हस्तक्षेप

ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना स्वतंत्रपणे काम करण्याची मुभा देण्यात यावी. त्याच पद्धतीने केंद्र सरकार आणि राज्य सरकारी यांनी पारदर्शक व कार्यक्षमपणे धोरण तयार करून त्याची अंमलबजावणी करण्याची मागणी केली जात आहे. परंतु वास्तवात ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि त्यामध्ये होणारा राजकीय हस्तक्षेप यामुळे ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था अनेक वेळा राजकीय कुरघोड्यांच्या शिकार होताना दिसतात. त्यामुळे ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेचे एकूणच कामकाज प्रभावी होण्याऐवजी त्या संस्थांची स्थिरता आणि विकास कामांमध्ये अडथळे निर्माण होतात. राजकीय पक्षाकडून ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका राजकीय फायद्यासाठी वापरल्या जातात. राजकीय पक्ष अनेकदा ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये हस्तक्षेप

करतात. त्यामुळे ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांचे कार्य स्वतंत्रपणे होत नाही. म्हणून ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची प्रक्रिया अत्यंत पारदर्शक, निष्पक्ष आणि केंद्र किंवा राज्य सरकारच्या राजकीय हस्तक्षेपापासून पूर्णपणे मुक्त असावी, अशी मागणी होत आहे. यामुळे स्थानिक प्रशासनाची कार्यक्षमता वाढू शकेल.

## क.५ भ्रष्टाचार आणि पारदर्शकतेचा अभाव

ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये वाढत जाणारा भ्रष्टाचार आणि या संस्थांमधील पारदर्शकतेचा अभाव हा एक मोठा वादविवादाचा मुद्दा बनलेला आहे. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये आलेल्या निधीचा वापर योग्य पद्धतीने होत नाही किंवा स्थानिक अधिकारी त्याचा दुरुपयोग करतात किंवा निधीचा अपव्य होतो. त्यामुळे ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये पारदर्शकता वाढवण्यासाठी पक्षपातीपणा कमी करणे, तंत्रज्ञानाचा वापर वाढवणे तसेच अंमलबजावणी व्यवस्थेमध्ये सुधारणा करणे आणि नियंत्रण यंत्रणा अधिक कडक करणे आवश्यक आहे. थोडक्यात तंत्रज्ञानाचा वापर करून ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेचे प्रशासन अधिक पारदर्शक करण्यासाठी मजबूत यंत्रणा तयार करणे आणि भ्रष्टाचारावर नियंत्रण मिळवणे आवश्यक आहे.

## क.६ विकास कार्यातील विलंब

ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेअंतर्गत येणाऱ्या भागांमध्ये पायाभूत सुविधा, शाळा, रस्ते, आरोग्यसेवा इ. चा अभाव आहे. वरील पायाभूत सुविधांसाठी असलेल्या विविध सरकारी योजनांची अंमलबजावणी वेळेवर होत नसल्यामुळे या योजनांचा उपयोग स्थानिक लोकांना होत नाही. यासाठी ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक सक्षम करून पायाभूत सुविधा देणाऱ्या योजना अधिक जलद गतीने अंमलात आणण्याची गरज आहे. यासाठी ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सदस्यांना प्रशिक्षण देऊन सक्षम बनवणे आवश्यक आहे.

## क.७ कायदा आणि सुव्यवस्था

ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना स्थानिक पातळीवरील कायदा आणि सुव्यवस्था राखण्याचे पूर्ण अधिकार किंवा स्वातंत्र्य नाही. त्यामुळे या संस्था आपले प्रशासन मजबूतपणे राबवू शकत नाहीत किंवा स्थानिक समस्यांवर त्वरित कार्यवाही करण्यास त्यांना मर्यादा येतात. त्यामुळे हा एक ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संदर्भात वाद विवादात्मक मुद्दा बनलेला आहे. पर्यायाने ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक कायदेशीर अधिकार दिल्यास ते स्थानिक पातळीवरील कायदा आणि सुव्यवस्था ठेवण्यात सक्षम होऊ शकतात आणि स्थानिक पातळीवरील प्रशासन प्रभावीपणे चालू शकतील, म्हणून ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना कायदा आणि सुव्यवस्थे संदर्भात अधिक अधिकार देण्याची मागणी होत आहे.

## क.८ ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांची संरचना

ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांची संरचना योग्य नसल्यामुळे स्थानिक पातळीवरील निर्णय प्रक्रिया लांबणीवर जात असते आणि पर्यायाने विविध योजनांच्या अंमलबजावणीला विलंब होत असतो. म्हणून ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संरचनात्मक रचनेत काही बदल करून ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांची कार्यक्षमता वाढवण्यासाठी सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, नवीन प्रशासकीय दृष्टिकोनाचा वापर आणि प्रशिक्षणाची देण्याची भूमिका घेतली जावी अशी मागणी वाढत आहे.

## क.९ सारांश

अशाप्रकारे ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संदर्भात वर्तमान काळात काही वाद-विवादात्मक मुद्दे चर्चेत आहेत. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांची कार्यक्षमता वाढवण्यासाठी त्यांना अधिक स्वायत्तता देणे, अधिक वित्तीय संसाधने पुरवणे, कारभारात भ्रष्टाचार कमी करून पारदर्शकता वाढवणे, राजकीय हस्तक्षेपावर नियंत्रण ठेवणे, महिलांचे खऱ्या अर्थाने सशक्तिकरण करणे, स्थानिक पातळीवरील कायदा व सुव्यवस्थेत सुधारणा करणे आवश्यक आहे. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक सक्षम करण्यासाठी सर्व स्तरावर वरील वाद विवादांवर एकत्रितपणे प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांची कार्यक्षमता वाढवून ग्रामीण विकासाला गती मिळू शकेल. त्याचप्रमाणे ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना सक्षम करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारने योग्य धोरणाचा अवलंब करणे आणि त्यांना संसाधनांची मुबलक उपलब्ध करून देणे आवश्यक आहे, तरच ग्रामीण विकासाला खऱ्या अर्थाने गती मिळू शकेल आणि स्थानिक लोकांना अधिक समृद्ध जीवन जगता येईल.

## आपली प्रगती तपासा

1) 73 व्या घटनादुरुस्तीचे उद्देश लिहा.

2) 73 व्या घटनादुरुस्तीची प्रमुख वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

3) 74 व्या घटनादुरुस्तीचे प्रमुख उद्देश लिहा.

4) 74 व्या घटनादुरुस्तीची प्रमुख वैशिष्ट्ये सविस्तर लिहा.

5) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेतील वर्तमान वादविवाद हा विषय सविस्तर लिहा.

6) ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेतील वर्तमान वादविवाद स्पष्ट करा.

❄❄❄❄❄❄❄